इशाकृपाही केवलं.





# विंचूरकर घराण्याचा



# इतिहास.



हा ग्रंथ

अनेक जुने लेख, कागदपत्र, दाखले

आणि कांहीं इंग्रजी ग्रंथ

यांच्या आधारानें



## हरी रघुनाथ गाडगीळ

निसबत विंचूरचे चीफ

यांनीं तयार करून

**पुणें येथें**



"पुणेंवैभव" छापखान्यांत छापविला.

—o—



आगस्ट सन १८८३ इसवी.

# समर्पणपत्र-

श्रीमंत राजमान्य राजश्री रघुनाथराव विठ्ठल उर्फ अंणासाहेब विंचूरकर, उमदेतुलमुल्क बाहादूर, कंपानियन ऑफ धि मोस्ट एक्झालटेड ऑर्डर ऑफ धि स्टार ऑफ इन्डिया, विंचूर संस्थानचे मालिक. स्वामींचे सेवेशी.

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंतीविशेष. मी मोठ्या परिश्रमानें अनेक पुस्तकें व आपले दफ्तरांतलि कित्येक कागदपत्र व दाखले यांचे आधारानें आपले थोर व नामांकित घराण्याचा इतिहास जमवून त्यांत आपले संस्थानचे मुळ संपादक विठ्ठल शिवदेव यांजपासून आपल्यांपर्यंत प्रत्येक पिढींत ज्या पुरुषास सरदारी प्राप्त झाली त्यापुरुषाचे कारकिर्दितील पृथक वृत्तांत दाखल केलाआहे. हा इतिहास तयार झाल्यापर ह्याची लोकांत प्रसिद्धी करण्यास्तव मी आपली परवानगी मागीतली. ती देण्याची आपण मेहेरबानगी केल्यानें मी आपला फार आभारी झालों आहें.

विशेष सौजन्यता, मनाचा थोरपणा, विद्वत्ता, देशपर्यटणापासून–प्राप्तझालेली माहितगारी, परोपकारबुद्धी, क्षमाशिळता, राजनिष्टा वगैरे अनेक सद्गुणांचा संग्रह आपले ठिकाणीं प्रकाशीत आहे, त्यामुळें माझे अंतकर्णांत आपल्यांविषयीं मान्यताबुद्धी बहुत दिवसांपासून वस्तीकरून आहे. त्याचें सार्थक मानून मी हा ग्रंथ आपल्यांस परमादरानें नजर करीत आहें. याचा आपण स्विकार करावा अशी आपल्यांस माझी अंतःकर्ण पूर्वक प्रार्थना आहे. बहुतकाय लिहिणें; सेवेशी श्रुत होयः हि विज्ञापना.

पुणें. तारीख १ माहे आगस्ट सन १८८३ इसवी.

आपले पदरचा
हरी रघुनाथ गाडगीळ,
इंग्रजी व मराठी कारकून.

# प्रस्तावना.

---

अति प्राचीन कालापासून या भरतखंडास "आर्यावर्त" अशी संज्ञा असून यांत मुख्यत्वेंकरून उंच वर्णाचे लोकांत संस्कृत भाषा चालू होती व हे लोक सुशिक्षित, विद्वान, ज्ञानसंपन्न व पराक्रमी असे असून यांत नानाप्रकारचे प्रतापी योध्धे, प्रख्यात ग्रंथकार व कवी असे होऊन गेले. त्या ग्रंथकारांपैकींच पाणिनी, अमरसिंह व कालिदास हे होत. पाणिनी यानें जें व्याकर्णशास्त्र केलें ते अद्यापी अपूर्व व अप्रतीम आहे. अमरसिंह याचे ग्रंथांपैकीं अमरकोश अद्यापी कायम असून तो संस्कृत अभ्यास करण्याचे कामीं पुष्कळ उपयोगीं पडतो. कालिदास यानें ज्या कविता, काव्यें, नाटकें वगैरे ग्रंथ केले ते सर्वमान्य असून संस्कृत विद्यार्थ्यांस त्यांपासून संस्कृत भाषेचें चांगलें परिज्ञान होतें.

जरी त्याकालीं हा देश स्वसत्ताक्रांत असून मोठा बलाढ्य होता, तरी ह्यांत पुढें अनेक घालमेली झाल्या, त्यामुळें हा दुर्बल होऊन याची स्थिति अगदीं निकृष्ट झाली. त्यासंबंध्धीं हकीकत पुढें थोडक्यांत लिहितों.

सुमारें २९०० वर्षांपूर्वी या देशांत गया येथें बुध नांवाचा एक शास्त्रवेत्ता महापुरुष उत्पन्न झाला. त्यानें आपले विद्वत्तेचे जोरानें संपूर्ण ब्रह्मवृंदास जिंकून, अहिंसाधर्म चालू केला. त्यामुळें मुळचा वेदप्रणीतआर्यधर्म माजीपडून उत्तरोत्तर नष्टझाल्या सारिखा झाला. त्याचवेळेस बौध्यधर्मानुयायी राजे यांनीं आर्यधर्माचे वेत्ते ब्राह्मण यांचा अत्यंत छल करून त्यांचे पुस्तकांचा नाश केला. त्यामुळें त्यांस वस्तींतून निघून अरंण्यांत दरींकंदरीं राहणें भाग पडलें. हा नवीन दयाधर्म सुमारें ६०० वर्षें चालला. या कालाचे शेवटीं यवन जातीचा सिकंदर नामक बादशाहा पश्चिमेकडून मुलुक काबीज करीत येत असून तो भरतखंडावर स्वारी करणार अशी खबर या देशांतील चंद्रगुप्त नांवाचा आर्य बादशाहा ( माहाराजाधिराज ) याजकडे आल्यावरून त्यानें व त्याचे ताब्यांतील अनेक

क्षत्रिय राजे यांनीं अहिंसाधर्म सोडून देऊन आपले पूर्वजांचा जो वेदप्रणीतधर्म तो पुनः स्विकारिला, कारण, बौध्यधर्मात हिंसाकरण्याची ह्मणजे कोणताही जीव मारण्याची मनाई केलेली असून आर्यधर्मांत लढाईत तरवार करून मरूनजाणें हें मोठ्या पुरुषार्थाचे कृत्य धरिलेलें होतें. आणखी, निकरानेंबिकट लढाई करून जय मिळविल्या शिवाय उद्भवलेल्या परचक्राचें निवारण होण्याचा संभव मुळींच नव्हता.

त्याआलीकडे ह्मणजे सुमारे १९०० वर्षांपूर्वीं या देशावर प्रथम हूण लोक व मागाहून पार्शी लोकांचा राजा यांनीं सरासरी १००–१२५ वर्षांचे अंतरानें निरनिराळ्या स्वाऱ्याकरून पुष्कळ नासधूस केली; परंतु क्षत्रिय लोकांचे भीतीमुळें त्यांस स्वदेशास परतजाणें भागपडलें. त्याआलीकडे ह्मणजे सुमारें ८०० वर्षांपूर्वीं मुसलमान लोकांनीं तर ती गोष्ट शिखरासच नेऊन पोंहोंचविली, कारण, त्यांनीं या देशांत अंमल करून आपली बादशाहत स्थापन केली; आणि लक्षावधी हिंदू * लोक कत्तलकरून हजारों मनुष्यें जबरीनें बाटविलीं; आणि त्यांची कित्येक मोठ मोठालीं शहरें लुटून तीं जमीनदोस्त करून टाकिलीं; आणि शेंकडो देवालयें व मूर्ती फोडून, त्या देवालयांचे ठिकाणावर मसूजीदी स्थापन केल्या. त्याचप्रमाणें हिंदूंची जीं हजारों पुस्तकें त्यांचे हातीं लागलीं त्यांचाही त्यानीं नाश केला. त्यामुळें हिंदुस्थानांतील प्राचीन विद्या व कलाकौशल्यें यांवरील अमोलिक ग्रंथ व इतिहास नष्ट होऊन प्राचीन सुधारणूकेचा मागमोस सुद्धां राहिला नाहीं. इतकीं अनुचित कृत्यें केल्यावर देखील त्या लोकांनीं स्वस्थपणें राज्य केलें असें नाहीं. हिंदू लोकांवर इतका जुलूम चालविला

---

* भरतखंडावर मुसलमान लोकांची पहिली स्वारी होण्यापूर्वी भरतखंडवासी लोकांस, "आर्य" असी संज्ञा होती; परंतु मुसलमान लोक त्यांस "हिंदू" व भरतखंडास "हिंदुस्तान" असें ह्मणूं लागले, कारण, जे मुसलमान लोक प्रथम भरतखंडावर हल्ला करण्यास आले त्यांचा वर्ण गोरा होता व आर्य लोक हे त्यांजपेक्षां काळे होते; आणखी, आर्बी भाषेत "हिंदू" या शद्वाचा अर्थ काळा व "हिंदुस्तान" या शद्वाचा अर्थ काळेलोकांचादेश असा होतो. कालेंकरून फारशी शद्व "स्तान" हा बदलून त्याचे ऐवजीं हिंदूलोकहे संस्कृत शद्व "स्थान" याचा उपयोग करूं लागले.

कीं, ते अत्यंत त्रस्त होऊन त्यांचे मुखांनीं " त्राही भगवान् त्राही भगवान! " असे उद्गार सर्वकाळ निघूं लागले. याप्रमाणें हिंदू लोकांची स्थिति झाल्यानें त्यांचे पुढील संततीस सुशिक्षा न मिळून ती उत्तरोत्तर अज्ञानांधःकारांत बुडाली. मुसलमानलोकांचें राज्य या देशांत सुमारें ६०० वर्षें चालल्यामुळें प्राचीनकालीं जें हिंदुस्थान विद्वत्ता व ज्ञानसंपत्ती यांचे मुख्य अगर होतें त्याचे स्वरूप अगदीं बदलून त्याची स्थिती प्राचीनकाळीं कशी होती याची सुद्धां माहिती बुडाली.

परंतु ईश्वरेच्छेनें आलिकडे सुमारें २९० वर्षे झालीं असतील, मराठे लोकांचा उदय होऊन, दक्षिणेत शिवाजी भोसले, बाजीराव बल्लाळपेशवे व त्यांचे चिरंजीव रघुनाथराव पेशवे, मल्हाररावहोळकर विठ्ठलशिवदेव,माहादजीशिंदे, वगैरे कित्येक पराक्रमी वीर उत्पन्न झाले. त्यांनीं तरवार गाजवून मुसलमान लोकांचें प्राबल्य मोडून टाकिलें, आणि आर्यधर्माचें रक्षण करून प्राचीन विद्यावृद्धीस उत्तेजन दिलें. त्यामुळें ब्राह्मणजातीमध्यें संस्कृत भाषेच्या ग्रंथांचा आभ्यास वाढून काशी वगैरे क्षेत्रें व पुणें वगैरे शहरें यांत हजारों वैदिक, शास्त्री, जोतिषी, पुराणीक वगैरे तयार झाले व अणखी ही पुष्कळ विद्वान तयार झाले असते; परंतु यादेशांत मराठे लोकांचे वर्चस्व व राज्य चीरकाळ चालावें अशी परमेश्वराची इच्छा नव्हती सें दिसतें. त्याचें कारण पुढें लिहितों.

दक्षिणेंत मराठ्यांचा उदय होण्याचे सुमारास इंग्लंड देशांतून व्यापारी लोकांची एक कंपनी ( मंडळी ) हिंदुस्थानांत येऊन तिनें दिल्ली येथील मोघल बादशाहाचे परवानगीनें सूरत, मुंबई, मद्रास, कलकत्ता, वगैरे ठिकाणीं विलायती मालाच्या कोठ्या बांधून व्यापार चालविला होता. हिंदुस्थानांतील राजे यांचे आपसांतील कलहामुळें उत्तरोत्तर त्या व्यापारी लोकांस राज्यकारस्थानांत शिरण्यास सवड झाल्यावरून त्यांनीं प्रथम बंगाल सुभ्याचा नबाब यास पदच्युत केलें, आणि त्याचे गादीवर आपले तर्फेचा नवा नबाब बसवून त्याचे रक्षणाकरितां पुष्कळ कवायती फौज ठेविली. त्या संधीस दिल्लीचे बादशाहाची सत्ता अगदीं कमी झाली असल्यामुळें बंगालचे नबाबास पदच्युत केल्याबद्दल परदेशी व्यापारी

मंडळीचे पारिपत्य करण्याचें सामर्थ्य त्याचें आंगी राहिलें नव्हतें. त्या कारणानें त्याकंपनीची सत्ता दिवसानदिवस अधिक वाढून त्या लोकानीं कर्नाटकांत टिपू सुलतान याचें राज्य बुडविलें आणि मागाहून पुणें येथील पेशव्यांचें राज्य ही नष्ट करूनटाकिलें. तेणेंकरून उत्तरोत्तर संपूर्ण हिंदुस्थानांत त्यांचें प्राबल्य होऊन तेथें ते सार्वभौम राज्य करूंलागले. ते लोक जरी आचारसंपन्न नव्हते तरी त्यांचे अंगी कित्येक सद्गुण होते. त्यां पैकीं विद्या व कलाकौसल्यें यांस उत्तेजन देणे, ज्ञानाचा प्रसार करून आपली प्रजा सुशिक्षित करणें, इनसाफ़्करणें आणि व्यवहारांतील सर्व गोष्टी निर्बंधानें चालविणें, या मुख्य गोष्टी होत्या. दक्षिणेंत स्थीरस्थावर झाल्यावर त्या लोकांनीं जागोजाग शाळा स्थापून आपले रयतेस विद्यादान करण्याचा क्रम सुरू केल्यामुळें उत्तरोत्तर विद्येचा फैलाव होऊन हाल्लीं या देशांत पुष्कळ लोक विद्वान झाले आहेत. त्यांनीं जगाचे प्राचीन व आर्वाचीन इतिहास, निर्निराळे योध्धे व विद्वान पुरूष यांची चरित्रें, राजेरजवाडे यांच्या घराण्यांचे इतिहास वगैरे नानाप्रकारचे ग्रंथ छापून प्रसिद्ध केले आहेत. ते वाचिल्यानें मनास आवंद वाटते। इतकेंच नाहीं, तर, व्यवहारांत सुद्धां वाचणाराची अक्कल वाढत्ये.

खालींसहीकरणारा हा बहुत वर्षें विंचूरचे चीफ यांचे पदरीं आहे. त्याजकडे त्या चिफांचे इंग्रजी पत्रव्यवहाराचें काम आहे. त्या कामाचें संबंधानें त्यास विंचूर संस्थानचे दफ्तरांत पेशवाई व इंग्रजी अमलांतील मराठी कागदपत्र पाहाण्याचा पुष्कळ वेळा प्रसंग येतो. त्यावरून पेशवाई अमलांत विंचूर येथील दौलतीचे मुळसंपादक विठ्ठल शिवदेव यांनीं शिंदे, होळकर व इतर प्रख्यात सरदार यांच्याच प्रमाणें तरवार गाजवून दाक्षिणेंत व उत्तर हिंदुस्थानांत मोठी कीर्ती संपादन केली होती असें त्यास पक्कें माहीत झालें आहे.

आलिकडे नूतन विद्वान लोकांनीं पुष्कळ मराठी ग्रंथ छापून प्रसिद्ध केले आहेत असें वरलिहिलेंच आहे. त्यांपैकीं कित्येक चरित्रें खालींसहीकरणाराचे वाचण्यांत आलींआहेत; परंतु त्यांत विंचूर येथील दौलतीचे मूळसंपादक यांचे चरित्र किंवा

त्यांचे घराण्याचा इतिहास त्यास कोठे ही आढळला नाहीं. स-बब इतर चरित्रे व इतिहास याचप्रमाणें त्यांचे चरित्र किंवा त्यांचे घराण्याचा इतिहास छापून लोकांत प्रसिद्ध करणें अवश्य आहे असें त्यास वाटल्यावरून त्यानें त्या कार्याकरितां दाखले वगैरे सामोग्रीची जमवाजमव चालविली. त्याजवळ ग्रांटडफ साहेबांनीं पुर्वी मराठ्यांचा इंग्रजी इतिहास केला त्याची छापील प्रत होतीच. शिवाय, त्यानें हिंदुस्थानचा इंग्रजी इतिहास, मराठीबखरा, वगैरे बरेंच सामान पैदा केलें; परंतु तेवढ्याच सामोग्रीनें आपण यो-जीलेलें चरित्र किंवा समग्र इतिहास आपल्यास उत्तमप्रकारें तयार करितां येईल असें त्यास वाटलें नाहीं. सबब त्यानें आ-पले मालिक श्रीमंत राजमान्य राजश्री अंणासाहेब विंचूरकर यांस आपला हेतु कळवून विंचूरसंस्थानचे दफ्तरांतील कागदपत्राची मदत देण्याची मेहेरबानगी करण्याविषयीं त्यांस विनंती केली. ती विनंती विंचूरकरमौसूफ यांनीं मान्यकरून त्यास लागतील ते कागपपत्र आपले दफ्तरांतुन घेण्याची उदारमनानें परवानगी दिली. त्यावरून त्यानें त्यांच्या दफ्तरांत तपास चालविला. तेव्हां त्यास त्या घराण्याची एक जुनी बखर, पेशजी त्यांनीं [ वि-चूरचे चिफ यांनीं ] इंग्रज सरकारांत आपले घराण्यासंबंधी जी एक कैफियत गुजराविली होती तिची नक्कल, विठ्ठलशिंवदेव यांस पेशव्यांकडून सफरेत गेलेलीं पत्रें, यादी, व जमाखर्चाचे कागद, येणेंप्रमाणें दाखले मिळाले. शिवाय, त्यानें त्या संस्थानांतील पु-रातन माहितगार लोकांकडून तोंडची माहिती ही मिळविली. नंतर त्यानें त्या सर्व दाखल्यांचे व माहितीचे आधारानें विंचूरकर यांचे घराण्याचा इतिहास लिहिण्यास आरंभ केला, आणि सरा-सरी दीडवर्षपर्यंत मेहेनत केल्यावर ईश्वरकृपेनें हाल्लीं तो इतिहास तयार झाला आहे.

या इतिहासाची भाषा व लिहिण्याची पद्धत कारकूनी म्हणजे दरबारी असल्यामुळें नूतन अभ्यासी यांस यांतील कितीएक शद्ब समजणार नाहींत असें संभवतें. याकारितां ज्या टिकाणीं खालीं सहीकरणारास असें शद्ब समयविशेषीं घालणे उचीत वाटलें त्या ठिकाणीं त्यानें टीप करून त्या टिपेंत किंवा कौंस करून

त्या कौंसांत त्या शद्बांचें अर्थ लिहिले आहेत व त्याखेरीज त्यानें या ग्रंथास दरबारी शद्बांचा एक लाहानसा कोश जोडून त्यांत असे शद्ब अर्थां सुद्धां विल्हेवारीनें लिहिले आहेत. हा इतिहास वाचीत असतां वांचणारांस एकादे शद्बाचा अर्थ समजलानाहीं तर त्यांनीं तो शद्ब त्या कोशांत पाहावा, म्हणजे त्याचा अर्थ त्यांस तेथें कळून येईल.

आलिकडे नवीन मराठी ग्रंथ पुष्कळ होत असून मराठी वर्तमानपत्रें ही पुष्कळ चालू झालीं आहेत. त्यांत मराठी शद्बांची अक्षरें लिहिण्याची पद्धत पडली आहे ती प्रथम एकाचें लिहिलेलें पाहून त्याप्रमाणें दुसऱ्यानें ल्याहावें अशा प्रकारची आहे. याचीं उदाहरणे अशीं कीं पठाणलोकांचे देशास "आफघानस्तान" असें नांव आहे. त्या लोकांचे भाषेंत "ण" हें अक्षर मुळींच नाहीं. असेंअसतां, हाल्लीं त्या शद्बाचे ऐवजीं नवीन मराठी ग्रंथांत व वर्तमानपत्रांत "आफगाणिस्थान" असा शद्ब आढळतो. या अपभ्रंशाचें कारण असें दिसतें कीं प्रथम कोणी आफगाणिस्थान असें चुकून लिहिलें असेल व तें पाहून दुसऱ्यानें व तिसऱ्यानें तसेंच लिहिलें असेल, कांकी, दुसऱ्यांचे पाहून लिहिण्याची आपले लोकांस संवयच आहे. याचप्रमाणें फारसी भाषेंत "वकूफ" म्हणजे ज्ञान किंवा अक्कल असा शद्ब आहे. त्या पासून "बेवकूफ" म्हणजे अज्ञान किंवा मूर्ख असा शद्ब झालेला आहे. परंतु "बेवकूफ" असें न लिहितां लोक हाल्लीं त्याचे ऐवजीं "बेकूब" असें बोलूं व लिहूं लागले आहेत. सारांश, मुळशद्बांची माहिती करून न घेता केवळ दुसऱ्याचे तोंडानें ऐकून त्या अजमासानें लोक कांहीं तरी बोलतात व लिहितात अशी उदाहरणें शेंकडों आहेत; परंतु स्थलसंकोचास्तव वर दोनच दाखविलीं आहेत.

खालींसहीकरणारानें थोडा फारसीचा अभ्यास केला असून त्याच लखनौ शहरात कित्येक विद्वान व दरबारी फारसीनवींसां बरोबर सहवास झाला आहे. त्यायोगानें मराठी भाषेंत येणाऱ्या बहुतेक फारसी शद्बांचा चांगला शोधकरून ते शब्द शुद्धरीतीने लिहिण्यास तो समर्थ झाला आहे. त्यानें हाल्लीं तयार केलेले विंचूरकर

घराण्याचे इतिहासांत जे दरबारी शब्द घातले आहेत ते चांगले माहितीनं घातले आहेत. त्यांविषयीं वाचणारांस कांहीं शंका येतील तर त्यांनीं त्यास विचारावें. ह्मणजे तो यथाशक्ती त्यांचे समाधान करील.

खालींसहीकरणारा हा केवळ एक इंग्रजी रायटर व मराठी कारकून आहे नवीन ग्रंथ रचण्याचा हा त्यास प्रथमच प्रसंग आहे सदर्हू इतिहास जरी त्यानें आपले मत्तें बिनचूक तयार केला आहे, तरी यात कदांचित अशुद्धें, वैगुण्यें, व दोष असतीलच, कारण, ज्याचे दोष त्यास कळून येत नांहींत, व चुकतनाहीं असा जगांत सर्वज्ञ परमेश्वरा शिवाय दुसरा कोणीच नाही. या करितां सूज्ञ वाचकांस त्याची विनयकपूर्वक अशी प्रार्थना आहे कीं यांत कांहीं अशुद्धें, वैगुण्यें, अगर दोष आढळतील तर त्यांनीं त्यांबद्दल त्यास थोरमनानें क्षमा करावी.

हरी रघुनाथ गाडगीळ.

# अनुक्रमणिका.

## भाग १

## विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांचे चरित्र.

### प्रकरण १.

प्रकरण ४.



प्रकरण ५.



प्रकरण ६.

## प्रकरण ७.



---

## भाग २.

## शिवाजी विठ्ठल विंचूरकर यांचे चरित्र.

## खंडेराव विठ्ठल विंचूरकर यांचे चारित्र.

## नरसिंह खंडेराव विंचूरकर यांचे चरित्र.

## विठ्ठलराव नरसिंह विंचूरकर यांचे चरित्र.

---

## भाग ३.

## रघुनाथराव विठ्ठल विंचुरकर यांचा वृत्तांत.

### प्रकरण १

# विंचूरकर घराण्याचा इतिहास

## भाग पहिला.

### मूळपुरूष विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांचें चरित्र.

### प्रकरण १

विठ्ठल शिवदेव हे ऋग्वेदी ब्राम्हण असून त्यांचें मूळचें उपनांव दाणी असें होतें. पुढें ते विंचुरास राहूंलागल्यापासून लोक त्यांस विंचूरकर असें ह्मणूंलागले. विंचुरास राहाण्याचें कारण वाचकांस पुढें चरित्रांत कळूनयेईल.

सुमारें दोनशें वर्षांपूर्वी सासवड येथील दाणीपणाचें वतन विंचूरकर यांचे पुर्वजांकडे चालत होतें. त्यावतनाचें काम त्या काळीं इतकेंच होतें कीं, दाण्यानें भरलेली गाडी, बैल किंवा तट्टू येईल तें दाणीनें टिपूनघेऊन दफ्तरांत ठेवावें. त्याबद्दल त्याचा हक्क ह्मटला तर त्यानें दरगोणिस एक एक ओंजळभर धान्य घेतजावें इतकाच होता. त्यावतनासंबंधीं दोनशे वर्षांपूर्वींचे जुने लेख विंचुरकरांचे दफ्तरीं आहेत त्यावरून वरील गोष्ट सिद्ध होते. या वतनावरूनच प्रथम त्यांचें दाणी असें उपनांव पडलेंअसावें असें दिसतें. या उत्पन्ना खेरीज प्राचीन काळापासून सासवड येथे त्यांच्या इनामी व मिराशी बागाईत अशा जमिनी होत्या; त्यांचें उत्पन्न हाल्लीं त्याचे वंशज उपभोगीत आहेत. *

वरसांगितलेले दाणीपणाचे वतनाचा उपभोगकरणारा यास दोन पुत्र झाले. तेव्हां शास्त्राप्रमाणें वतनाचा निमेंनिम विभाग झाला. वडील विभागदाराचा वंश हाल्लीं सासवड येथे कायम् असून तो तेथील इनामी व मिराशी जमिनी उपभोगीत आहे

* विंचूरकर याचें दफ्तर.

असें वर लिहिलेंच आहे. धाकटे विभागदाराचे वंशांत विठ्ठल शिवदेव ह्मणजे ज्या पुरुषाचा इतिहास आह्मी लिहीत आहों तो पुरुष सन १६९५ इसवी सालीं सासवड येथें जन्मला. वडील घराण्यांत मालेगांव आणि नाशिक येथील राजेबाहादर यांचे मूळपुरुष नारोशंकर हे जन्मले. विठ्ठल शिवदेव जिवंत होते तोंपर्यंत तीन दिवसांचा सुयेर सुतक धरण्याची उभय शाखांमध्यें परस्पर वहिवाट होती. पुढें पिढ्या तुटल्या. हक्कदारांनीं वतनसंबंधीं उत्पन्न घेऊनये असा कायदा इंग्रजसरकारानें सन १८४० इसवीचे सुमारास केला. त्यापूर्वी वरील दोन्ही शाखांच्या पुरुषांनीं सासवडचे वतनाचा उपभोग निर्वेधपणें केला होता. पुढें कायद्याचे मनाईमुळें उभय शाखांतील पुरुषांस उत्पन्नाचे मानानें व कायद्यांतील अर्थाप्रमाणें रोखे देण्यात आले. पुढें रोख्यांत लिहिलेल्या रकमा सरकारानें वतनदार यांस रोख दिल्यामुळें त्यांस व्याज भरण्याची जरूर राहिली नाहीं. * त्या वेळेपासून सासवडचें सदहू वतन अगदीं बुडालें.

वर लिहिलेले धाकटे शाखेचे वंशांतील शिवाजीपंत यांस तीन पुत्र होते. वडील आबुराव शिवदेव, मधले त्रिंबक शिवदेव, आणि कनिष्ट विठ्ठल शिवदेव. विठ्ठल शिवदेव हेच काय ते विंचूरकर यांचे दौलतीचे मूळसंपादक असून त्यांस जातीची जाहागीर मिळाल्यावर त्यांनी वडील बंधू आबुराव यांचे वंशाचे गुजाऱ्यास आपले जाहागिरीपैकीं धोंडबें म्हणून गांव दिला. त्या गांवाचा कमाल आकार रुपये १, ६६९८४ आहे. तो गांव हालीं वडील वंशाकडे चालत आहे. मधले बंधू त्रिंबकराव यांचे गुजाऱ्यास त्यांनीं आपले फौज सरंजामापैकीं निंबगांव ह्मणून एक गांव दिला; परंतु पुढें तो गांव फौज सरंजामाबरोबर इंग्रज सरकारानें खालसा केला. यास्तव विठ्ठल शिवदेव यांजपासून पुढें चवथे पुरुष विठ्ठलराव नरसिंह ऊर्फ तात्यासाहेब यांनीं आपले जात सरंजामापैकीं मौजे मानोरी हा गांव त्या मधल्या भावाचे वंशास दिला. त्या

* विंचूरचे दफ्तरांतील बखर.

गांवचा कमाल आकार रु. ९,२४० आहे. तो गांव त्रिंबकरावांचे वंशज हालीं उपभोगीत आहेत.*

विठ्ठल शिवदेव यांचे वडील शिवाजीपंत यांचे घरची मुळची स्थिति साधारण होती. त्यांचे आबुराव आणि त्रिंबकराव हे दोघे पुत्र शाहाणे असून त्याच उभयतांनीं प्रापंचाचें ओझें संभाळिलें होतें; परंतु कनिष्ठ पुत्र विठ्ठलराव यांजपासून प्रापंचास कोणत्याच प्रकारची मदत होत नसे, कारण, त्यांस मुळापासून तालीम करणें व घोड्यावर बसणें यांचा मनस्वी शौक होता. विठ्ठलरावांनीं आपली शरीरसंपत्ती अशी वाढविली होती कीं, त्यांच्या इतका जोरदार पुरुष आसपास कोणीही नव्हता. त्यांनीं घोड्यावरबसणें व कसरत करणें या दोन गोष्टींचा अभ्यास रात्रंदिवस चालविला असतां, उभयतां वडील बंधू हे त्यांस वाईटसाईट बोलून फारच त्रास देत असत. ते त्यांस म्हणत कीं, "तू उगीच जोर काढून व मलखांबावर उड्या मारून आयुष्य मात्र व्यर्थ घालवितोस! त्यापेक्षां कोणाची तरी चाकरी केलीस तर पोटभर खाशील, व कदाचित् तुझें लग्न ही होईल." अशा प्रकारें उभयतां बंधूंकडून विठ्ठलरावांस वारंवार तसदी होत होती.

एके दिवशीं असा प्रकार झाला कीं, विठ्ठलरावांचे वडील त्यांस असें बोलले कीं, "तूं घरांत निरुद्योगी बसून दुसऱ्याचे कमाईवर उपजीविका करतोस; त्यापेक्षां मरतास तर बरें होतें! तुझे बंधू मिळवितात आणि तूं आयते खाऊन उनाडासारखा फिरतोस याची तुला लाज म्हणून वाटतच नाहीं काय.? आणि असेंच वर्तन पुढें ही ठेवणें असेल तर तूं घरांत राहूंनको, निघुन जा. हे शब्द विठ्ठलरावांस विषतुल्य वाटून त्यांच्या मनांत विरश्री-उत्पन्न झाली; आणि त्या वीरश्रीचे भरांत वडील, मातुश्री आणि उभयतां वडील बंधू यांस नमस्कारकरून ते घरांतून बाहेर निघून गेले. ते साताऱ्यानजीक तीन कोसांवर कृष्णा नदीचे तिरीं मर्ढे

* विंचूरचे दप्तर.

ह्मणून गांव आहे तेथें गेले. त्या मढें गांवांत आमृतस्वामी म्ह-णून रामउपासक व ब्रह्मचारी असे मोठे सिद्ध पुरुष होते. विठ्ठ-लराव यांनीं त्यांचें दर्शन घेतलें, आणि कांहीं दिवस त्यांची सेवा एकनिष्ठेनें केल्यानंतर स्वामीनीं त्यांजवर कृपा केली. पुढें स्वामी तीर्थयात्रेस गेल्यावर त्यांचे मठांत पावनबावा म्हणून त्यांचे मुख्य शिष्य होते त्यांजवळ विठ्ठलराव हे राहिले. त्यांनीं बावांच्या मठांतील कामकाज करावें आणि ते भजन करूंलागले ह्मणजे ह्यांस साथ करावी. असा क्रम कांहीं दिवस चालला. त्या यो-गेंकरून पुढें विठ्ठलराव यांजवर पावनबावांची ही कृपा झाली. या-प्रमाणें विठ्ठलराव हे पावनबावाची सेवा करीत असतां, तो सत्समा-गमरूपी वृक्ष फलद्रूप झाला. विठ्ठलराव यांची बुद्धी थोर हो-ऊन त्यांच्या आंगीं सत्कीर्ति मिळविण्याजोगें सामर्थ्य आलें. थोरांचा महिमा अगाध आहे. त्यांचे सहवासानें काय म्हणून होणार नाहीं. ? मनुष्यास थोरपणा येण्यास व त्याचे हातून अद्भुत पराक्रम घडण्यास सत्पुरुषांचे कृपेवांचून उत्तम साधन म्हणून दुसरें कोणं-तेंच नाहीं. शिवाजीमाहाराज यांस रामदास स्वामींचा प्रसाद किती उपयोगीं पडला. ? त्याचप्रमाणें धावडसीचे माहापुरुषापासून थोरले बाजीराव यांस स्वराज्य स्थापनकरण्याचा बीजमंत्र मिळू-न त्यानीं महत्कृत्यें केलीं आणि त्यांची सुकीर्ति दिगांतरीं गेली. तात्पर्य, प्रत्येक व्यक्तीकडून अलौकिक पराक्रम घडण्यास सत्पुरु-षाचा प्रसादच कारणिभूत होतो हें निर्विवाद आहे.

वरलिहिलेले मढें गांवांत एक प्रतिष्टित गृहस्थ राहात असून ते साताऱ्यास शाहुमाहाराजांचे पदरीं बक्षिगिरीचे कामावर होते. त्यांनीं पावनबावांचा अनुग्रह घेतला होता त्यामुळें बावांच्या मठांत त्यांचें येणें जाणें वारंवार होतहोतें. बावांनीं एके दिवशीं बक्षी यांस सांगितलें कीं, "मजजवळ विठोबा सासवडकर आहे. हा प्रामाणिक असून अत्यंत मेहनती ही आहे. यास तुम्ही आपले ज-वळ ठेवूनघेऊन याची साताऱ्यास कोठे तरी सोय करून द्यावी."

ही आज्ञा बक्षी यांनीं मान्य केली आणि विठ्ठलराव यांस आपले बरोबर सातान्यास घेऊन आपले घरीं ठेविलें. तेथें विठ्ठलराव हे मुख्यत्वेंकरून बक्षी यांचे घोड्यांची देखरेख करीत, व त्याखेरीज किरकोळ कामें ही करून त्यांचे पंक्तीस भोजन करीत असत.

शाहूमाहाराज यांस शिकारीचा मनस्वी शौक होता. एकेदिवशीं माहाराजांची स्वारी शिकारीस निघाली असतां विठ्ठलराव यांनीं ही स्वारीबरोबर जाण्याचा बेत केला. नंतर बक्षी यांचे पागेंतील एक घोडा बसावयास घेऊन ते स्वारींतील बारगिरांत मिश्र झाले. स्वारी कृष्णातीरीं गेल्यावर माहाराजांचे स्वारांनीं रानांत एका रानडुकरास घेरा घालून त्यासभोंवतें कडें केलें, आणि त्या डुकरास पळून जाण्यास अगदींच मार्ग ठेविला नाहीं. डुकर पळून जाण्यासाठीं हिकडून तिकडे व तिकडून हिकडे मुसांड्या मारूं लागला; परंतु त्यास कोठे ही रस्ता मिळेना. शेवटीं तो चवताळला आणि कडें फोडून जाण्यासाठीं मुसांडी मारून पळत असतां, विठ्ठलरावांस असें वाटलें कीं डुकर हातचा जातो; सबब त्यांनीं घोड्यावरून तात्काळ उडी टाकिली आणि धांवतजाऊन डुकरास दोन्ही पायांत जोरानें दाबून धरिलें, व दोन हातांनीं त्याचे कान धरून त्याचें पळूनजाणें बंद केलें. अशा रीतीनें कैद्याप्रमाणें धरून ठेविलेल्या डुकरावर शाहूमाहाराज हे घोडा टाकीत धांवून आले आणि त्यांनीं त्यास भाला मारून तात्काळ ठार केलें.

विठ्ठलराव यांची विलक्षण शक्ति व अनिवार्य धैर्य पाहून माहाराजांस साश्चर्य संतोष वाटला. तेव्हां त्यांनीं विठ्ठलरावांस विचारिलें कीं, "तुम्ही कोण, कोठील राहणार, व येथें येण्याचें कारण काय. ?" या प्रश्नांवरून विठ्ठलराव यांनीं शाहूमाहाराजांस आपली सर्व स्थीति कळविली; आणि शेवटीं "सरकारचे बक्षी यांचें घरीं मीं भोजन करून निर्वाह करितों." असें देखील सांगितलें. तें ऐकून माहाराजांनीं त्याच वेळेस विठ्ठलराव यांस बसण्यास सरकारी पागेंतील एक घोडा देऊन बारगिराचे पटांत त्यांचें नांव दाखल करवून त्यांस सदोदित हुजूर राहण्याची आज्ञा केली. हि गोष्ट सन १७१५

इ॰सालीं झाली. हाच काय तो विठ्ठलराव यांस प्रथम राजाश्रय मिळाला. परंतु शिंदेहोळकरवगैरे मराठे सरदार आणि फडकेपटवर्धनवगैरे ब्राम्हण सरदार हे जसे पेशव्यांचे चाकर म्हणवीत असत तसे विंचूरकर हे पेशव्यांचे चाकर नसून जुने सरदारांप्रमाणें हे माहाराजांजे पदरचे होते असें उघड दिसतें.

ज्या विंचूरकरांचे संस्थानावर पेशवाईंत सहस्त्रावधी माणसांचा उदरनिर्वाह चालत होता त्या विंचूरकरांस आपल्या पोषणा सार्ठी प्रथम बक्षी यांचे आश्रयावर अवलंबून राहणें भाग पडलें ! बहुतेक प्रख्यात पुरुषांची मूळस्थिती पाहिली तर हाच प्रकार आढळून येईल. श्रीमंत घराण्यांत उत्पन्न होऊन द्रव्याची व सुखाची सदा रेलचेल, अशा प्रकारच्या स्थितींत वाढून पुढें मोठ्या योग्यतेस चढलेले पुरुष वरच्या मानानें फारच कमी यांत संशय नाहीं. प्रत्येक मनुष्यास केव्हां तरी दुसऱ्याच्या टेंक्याची गरज लागते. प्रत्येकानें आपले पराक्रमावरच भरंवसा ठेवून चालावें ही गोष्ट जरी खरी आहे, तरी बाळपणीं मातेच्या संरक्षणावांचून मुलाचें झणून चालावयाचेंच नाहीं. त्याचप्रमाणें थोर पुरुषांचा उदयकाळ येईतोंपर्यंत त्यांस दुसऱ्यांचें साह्य घ्यावेंच लागतें; आणि त्या प्रसंगीं जर दुसऱ्यांकडून त्यांस योग्य मदत न झाली तर ज्या पुरुषापासून पुढें शेंकडों पुरुषांस साह्य मिळावयाचें तो पुरुष समान्य पुरुषाप्रमाणें जागचे जागीं अप्रसिद्धच राहील.

पुढें कितीएक शिकारीचे प्रसंगांत आणि राजकीय कामांत माहाराजानीं विठ्ठलराव यांचें धैर्य व चातुर्य पाहील्यावर त्यांनीं त्यांस दाहा घोड्यांची शिलेदारी देऊन हमेषा जवळ राहाण्याची आज्ञा केली. त्या वेळेस विठ्ठल शिवदेव यांचें वय एकवीस वर्षांचें होतें. विठ्ठलराव यांस शिलेदारी मिळाल्यावर त्यांनी आपलें लग्न केलें. त्यांची पत्नी वांईजवळील केंजळगांवाचे कुळकर्ण्याची कन्या होती. तिचें नांव त्यांनीं रखमाबाई असें ठेविलें.*

* विंचूरकर यांचे दफ्तरांतील जुनी बखर.

मुंबई बेटानजीक जंजिरा ह्मणून एक बेट आहे. तेथें सन १७२० इ. सालीं सिद्दी साद नांवाचा नबाब अंमल करीत होता. त्यानें दक्षिण कोंकणांत अतिशय धामधूम केली. त्याचें पारिपत्य करण्यासाठीं शाहूमाहाराज यानीं बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचे धाकटे पुत्र चिमाजीआपा यांस त्याजवर पाठवून विठ्ठल शिवदेव हे एक मोठे बाहादर शिलेदार ह्मणून त्यांचे तैनातीस दिले. चिमाजीआपा हे सिद्दी साद याचे छावणीजवळ पोंहोंचतांच लढाई सुरू झाली. त्या लढाईंत विठ्ठल शिवदेव हे आपली कीर्ती व्हावी म्हणून अत्यंत उत्कंठित असतां, त्यांनीं खुद्द सिद्दी साद याजवर त्वेषानें हल्ला केला. त्या हल्लयांतच त्यांनीं त्या नबाबास कत्तलकरून त्याचे फौजेचा अगदीं मोड केला आणि त्याचे पुष्कळ घोडे हस्तगत करून आपले गोटांत आणिले.

या विजयाचा सविस्तर मजकूर चिमाजीआपा यांनीं माहाराजांस लेखीं कळविल्यावरून माहाराज फार खुष झाले; आणि त्यांनीं कोंकणांत चिमाजीआपांस असा हुकूम पाठविला कीं, "पेशव्यांचें निशाण पूर्वींपासून भगवें आहे त्यास आतां जरीपटका लावावा; तसेंच विठ्ठल शिवदेव यांनीं आपल्या बाहादुरीनें सिद्दीपासून जे घोडे हिसकावून घेतलेआहेत त्यांजवर स्वारांची नेमणूक करून त्या स्वारांची सरदारी विठ्ठल शिवदेव यांसच द्यावी." पुढें चिमाजीआपा हे साताऱ्यास आल्यावर त्यांनीं माहाराजांस लढाईची सर्व हकीकत कळविली. विठ्ठल शिवदेव यांजवर माहाराजांची मर्जी खुष होऊन त्यांनीं त्यांस पेशव्यांच्या मुलुकगिरींत हमेषा राहण्याविषयीं हुकूम केला. त्या दिवसापासून विठ्ठल शिवदेव हे पेशव्यांचे तैनातीस राहूं लागले. *

सन १७२० इसवीचे आकटोबर महिन्यांत एक विशेष गोष्ट घडून आली. ती अशी कीं, सातारचे मुख्य प्रधान बाळाजी वि-

* विंचूरकर यांचे दफ्तरांतील जुनी बखर.

श्वनाथ हे मरण पावले. त्यांच्यामागें त्यांचे वडील पुत्र बाजीराव यांस पंतप्रधानाचे हुद्यावर कायम करूनये असें प्रतिनिधी व अष्ट-प्रधान मंडळीचें ह्मणणें होतें, कारण राजमंडळांत कोंकणस्थ ब्राह्मण नसावा अशी त्या मंडळीची इच्छा होती. या हरकती-मुळेंच कांहीं दिवस पर्यंत बाजीरावबल्लाळ यांस पेशवाईचीं वस्त्रें देणें तहकूब राहिलें होतें. तथापि शाहूमाहाराज यांनीं प्रधानमं-डळीची जात्याभिमानजन्य हरकत न ऐकतां प्रधानाचे आंगीं चातुर्य आणि शूरत्व हे गुण असावयाचे ते बाजीराव यांचे अंगीं आहेत असें पाहून सन १७२२ इसवीचे आरंभीं त्यांस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. *

---

## प्रकरण २.

### थोरले बाजीराव साहेब यांच्या कारकीर्दींत विठ्ठल शिवदेव यांनीं केलेला पराक्रम.

---

सन १७२३ इसवी सालीं माळव्याचा सुभेदार आजिमुल्लाखान यानें आपला सरदार दाऊदखान यास बाजीरावसाहेब पेशवे यांजवर पाठविलें असतां, खानदेशांत बऱ्हाणपुरानजीक त्या उभयतांची गाठपडून लढाई झाली, तींत विठ्ठल शिवदेव हे बाजीरावसाहेब पेशवे यांजबरोबर होते. त्यांनीं दाऊदखान याचा अगदीं मोड करून त्यास कत्तलकेलें; आणि त्याच्या फौजेची दाणादाण करून पूर्ण जय मिळविला. †

सन १७२४ इसवी सालीं बाजीरावसाहेब दिल्लीस गेले, त्या वेळेस ही विठ्ठल शिवदेव त्यांजबरोबर होते. त्यांनीं त्या स्वा-रींत दरएक वेळेस आघाडीची शिपाईगिरी केली, म्हणून त्यांस बाजीरावसाहेबांनीं फौज वाढविण्याचा हुकूम दिला.

---

* ग्रांडडफसाहेबांनीं केलेला मराठ्यांचा इतिहास.

† विंचूरचे दफ्तर.

वर पहिले प्रकरणांत मरढे येथिल अमृतस्वामी तीर्थयात्रा करण्यास गेले असें लिहिलें आहे. ते यात्रा करीतकरीत नीरा व भीमा ह्यांचे संगमतीर्थीं नृसिंहपूर म्हणून क्षेत्र आहे तेथें आले. नृसिंहाचें देवालय उभय नद्यांचें चिमटच्यांत असून जीर्ण दशेस आलें होतें; शिवाय, त्यानद्यांचे उदकाचे धक्कयाने दोन्हीबाजूंस त्यादेवालयाचा पाया पुष्कळ खचलाहोता. त्याचा जीर्णोद्धार लवकर झालानाहिं तर तें शेवटीं लयास जाईल असें त्यांस वाटलें. स्वामी पुढें सर्व तीर्थयात्रा करून दाहा-बारा वर्षांनीं मरढे गांवास परत आले. त्यासंधीस विठ्ठलशिवदेव यांचा उत्कर्ष झाला असून त्यांस सरदारी मिळालीहोती आणि ते पेशवे बाजीराव व त्यांचे बंधु चिमाजीआप्पा यांजबरोबर परराज्यावरील स्वाऱ्यांत तरवार गाजवीतहोते. स्वामी मरढ्यास परत आल्याची खबर त्यांस कळतांच ते त्यांचे दर्शनास गेले, आणि त्यांचे चरणांवर मस्तक ठेउनउठल्यावर सद्गुरू कृपेनें आपला उत्कर्ष झाला होता त्या संबंधीं त्यांनीं सर्व हकीकत त्यांस निवेदन करून विज्ञापना केली. ते म्हणाले, "माहाराज! मी जन्मास येऊन जें कर्तव्य तें केलें. इतउत्तर चरणा संनिध राहून सेवा करण्याची आज्ञा मला द्यावी." हें ऐकून स्वामी बोलले कीं, "अद्यापि तुझे हातांनीं मोठमोठालीं कृत्यें व्हावयाचीं आहेत. याकरितां तूं पेशव्यांचे संनीध राहून त्यांची एकनिष्टेनें सेवा कर, आणि नीतीनें वागून गाई ब्रांह्मणांचें रक्षण कर." नंतर भाषणाचा ओघ तीर्थयात्रेकडे वळला. त्यांत स्वामींनीं नृसिंहपूर येथील मुख्य देवाचें देवालय उभय नद्यांचे प्रवाहानीं अगदीं जीर्ण दशेस आलेंआहे असें त्यांस सांगून आज्ञा केली कीं, "तो देव तुझा कुलस्वामी आहे, याकारितां तूं त्या मंदिराचा जीर्णोद्धार कर." विठ्ठलराव यांस ती आज्ञा शिरसावंद्य होती; परंतु त्यांनीं विनंती केली कीं, "माहाराज! मी गरीब आहे. एवढें मोठें महत्कृत्य माझ्या हातांनीं कसें घडेल.?" स्वामींच्या मुखांतून अशीच अक्षरें निघालीं कीं, "श्रीराम तुझ्यांत

हातांनीं तें काम करवील. " त्या आशीर्वचनाप्रमाणें विठ्ठलराव यांनीं पुढें कांहीं कालानें तें देवालय बहुत पैसा खर्च करून उंच व अधीक प्रशस्त व पक्कया दगडांचें आणि मजबूत असें बांधिलें.

पुढें स्वल्प कालांतच आमृतस्वामी यांचें मरढें येथें निरयाण झालें. त्यांचा मठ व एकांतांत बसण्याची गुहा अद्यापपर्यंत मरढें येथें कायम राहिलीआहे; शिवाय, कृष्णेच्या कांठीं त्यांचें पक्कें बांधीव वृंदावन ही आहे. पुढें अमृतस्वामींच्या गादीवर त्यांचे मुख्य शिष्य पावनबावा हे बसले. त्यांचा वंश अद्यापपर्यंत त्यासंस्थानांत कायम आहे. *

सन १७३० इ० सालीं चिमाजीआपा यांची फौज माळव्यांत गेली होती, त्या वेळेस वीठ्ठल शिवदेव हे त्याफौजेबरोबर होते. दिल्लीचे बादशाहाकडून माळव्याचे सूभ्यावर दयाबहादूर नांवाचे सरदाराची नुकतीच नेमणूक झाली होती. त्या सुभेदारानें चौथ व सरदेशमुखी यांचा वसूलकरण्यास पेशव्यांस हरकत केली; त्यावरून दयाबाहादूर याशीं एक लढाई करण्याचा बेत झाला. त्या लढाईंत विठ्ठलशिवदेव यांनीं आपलें काम मोठ्याशौर्यानें व निर्भयपनानें बजावून दयाबाहादूर याचे फौजेची अगदीं दाणादाण केली आणि शेवटीं त्यास कत्तल करून पूर्ण जय मिळविला. †

सन १७३१ इसवी सालीं सयाजी गुजर यांस पेशव्यानीं गढेमंडळावर पाठवीलें. त्यावेळेस गुजर यांजबरोबर विठ्ठल शिवदेव यांस जाण्याची आज्ञा झाली. त्यालढाईत विठ्ठल शिवदेव यांनीं तरवार गाजवून तो किल्ला सर केला. ही सर्व हकीकत गुजर यांनी पेशव्यांस कळविल्यावर त्यांची मर्जी खुष होऊन त्यांनीं विठ्ठल शिवदेव यांस एकपृथक टोळीचे सरदार केलें. या वेळेपर्यंत विठ्ठल शिवदेव यांस साताऱ्याहूनच तैनात मिळतहोती. पुढें सन १७३३ इ० सालापासून ती पेशवे यांजकडून मिळूंलागली.

---

* विंचूरचे दफ्तरांतील जुनी बखर.

† विंचूरकर यांची कैफियत.

सन १७३३ इसवी सालीं फरखाबादचा नबाब फत्तेखान बंगष याची नेमणूक दिल्लीचे बादशाहाकडून माळव्याचे सुभ्यावर झाली. तेव्हां त्यानें बुंदेलखंडावर स्वारी करून छत्रपूरचे राजास संकटांत घातलें. त्यामुळें छत्रपूरचाराजा छत्रसाल यास बाजीरावसाहेब पेशवे यांची मदत मागणें भागपडलें.* त्या राजानें बाजीरावसाहेबांस मोठ्या मिन्नतवारीनें पत्र लिहिलें कीं, "माझ्या राज्याचें संरक्षण करावें." बाजीरावसाहेब त्यावेळेस माळव्यांत होते. त्यांनीं मोठ्या षिताबीनें कूच करून बंगष बाजवर छापा मारीला. तेव्हां बंगष याच्या फौजेची धूळधाणी होऊन त्यास त्या प्रांतांतून पळूनजावेंलागलें. त्या हल्लयांत विठ्ठल शिवदेव हे पेशव्यांच्या उजवे बाजूस असून त्यांनीं पेशव्यांबरोबर आपलें काम मोठ्या बाहादुरीनें बजाविलें. †

सन १७३९ इसवी सालीं चिमाजीआपा यांनीं वसईचा किल्ला सर करण्याची कामगिरी अपल्याकडे घेतली. त्यास्वारींत त्यांजबरोबर विठ्ठल शिवदेव होते. त्यावेळेस वसई आणि तिचे आसपासचे गांव यांची स्थिति फारच चमत्कारिक झाली होती. पोर्तुगीज लोकांनीं समुद्रकिनाऱ्यावरील पुष्कळ गांवें बाटविलींअसून धर्माचेबाबदींत त्यांनीं हिंदूलोकांवर पराकाष्टेचा जुलूम चालविला होता. सर्व कोंकणप्रांत फिरंगाणाचा करून सोडावा असा त्या लोकांनीं घाट घातलाहोता. या गोष्टीची चिन्हें त्या प्रांतीं गेलें असतां अद्यापी दिसून येतात. त्यांनीं ठाण्याचे आसपासचीं पुष्कळ गांवें बाटविल्यामुळें हाल्लीं तिकडे किरिस्तांव लोकांची वस्ती पुष्कळ वाढली आहे. असो; पोर्तुगीज लोकांच्या ताब्यातून वसईचा किल्ला घेण्यासाठीं ज्यावेळेस चिमाजीआपा यांनीं लढाई सुरूकेली, त्या वेळेस त्यांजबरोबर मुख्य सरदार म्हटले म्हणजे मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे,

---

* हा सविस्तर वृत्तांत 'श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे यांचे चरित्रांत' राव साहेब नागेशराव विनायक बापट यांनीं उत्कृष्टरितीनें लिहिला आहे.

† विंचूरचे दप्तरांतील जुनी बखर.

विठ्ठल शिवदेव, शंकराजी नारायण, मानाजी आंग्रे, व खंडोजी मानकर हे होते. कांहीं दिवस लढाई चालल्यानंतर पोर्तुगीज लोकांचे किल्लेदारानें विनंती केली कीं, " जंजिऱ्याचे सिद्दीबरोबर जसा तुमचा करार झालाआहे, तसा करार आम्हांबरोबर कराल तर आम्ही आसपासचा मुलुक सोडून देतों. " परंतु ती गोष्ट चिमाजीआपा यांचे मनास आलीनांहीं, कारण, त्यांस असें वाटलें कीं, असा मजबूत किल्ला शत्रूचे हातीं असतां आपण तेथून निघूनगेलों तर ते लोक दिलेला मुलुक सहज परत घेतील. याकरितां किल्ला सर केल्याशिवाय परत जाणें प्रशस्त नव्हे. मग लढाई पुनः झपाट्यानें चालू झाली. चिमाजीआपा यांचे मनांत बरसात सुरूहोण्यापूर्वी कसेंही करून किल्ला सरकरावा असें होतें. सबब त्यांनीं अनेकप्रकारें यत्न चालविला. तो असा कीं, मैदानांत जागोजाग मोर्चे बांधिले आणि किल्यावरील तोफांचा मारा चुकवून, एका मोर्च्यांतून दुसऱ्या मोर्च्यास जाण्याकरितां सलाबतकूचा (ह्मणजे जमीन खणून आंतून नागमोडीच्या आकाराचा रस्ता ) तयार केला. किल्यावरून त्यांजवर तोफा व गरनाळा यांचा वर्षाव सदोदित होत असे. त्यांमुळें लोक बहुत मरत. किल्यांत तोफा पुष्कळ होत्या; परंतु मराठ्यांनीं आपले मोर्च्यांत त्यांहीपेक्षां मोठाल्या तोफा व गरनाळा लावून शत्रूच्या तोफा बंद केल्या आणि किल्याचे तटास तोफेच्या गोळ्यांनीं हल्ला पोहोंचविण्यासारखा रस्ता केला. परंतु पोर्तुगीज लोकांनीं आपल्या सर्व तोफांचा भडिमार त्या एकाच ठिकाणावर केल्यामुळें मराठ्यांस आंत शिरतांआलेनाहींं. नंतर फेब्रुवारीचे १७ वे तारिखेस मराठ्यांनीं किल्ल्यास पूर्ण वेढा दिला. तथापि तीन महिने पर्यंत किल्ला हातीं आला नाहीं. दोहींकडील युद्धनिपुणतेची कमाल झाली. मराठ्यांच्या शूर शिपायांनीं होती तितकी पराकाष्टा करून पाहिली; पण सर्व व्यर्थझाली. शेवटीं त्यांनीं किल्यास पांचठिकाणीं सुरुंग लाविले. त्यांपैकीं दोन उडाले; तेणेंकरून तटास मोठें खिंडार पडलें. त्यावाटेनें

किल्यांत शिरण्याकरितां मराठे जवळ गेले; परंतु दुर्दैवेंकरून त्या वेळेस तटाचा तिसरा सुरुंग उडाला; तेणेंकरून पुष्कळ लोक पडले, व पोर्तुगीज लोकांनीं तीसंधी साधून गोळ्यांचा एकसारखा भडिमार चालविला; बंदुकांचा मारा तर असा केला कीं, त्या वेळेस मराठ्यांस मागें हटणें भाग पडलें. ते मागें हटतांच पोर्तुगीज लोकांनीं त्याखिंडारांत तात्काळ दगड रचून तो मार्ग बंद करून टाकिला. तटाचा एक सुरुंग मात्र उडणें राहिला होता. तो उडविण्याचे काम मल्हारराव होळकरांनीं पत्करिलें होतें. त्या सुरुंगास त्यांनीं बत्ती दिली त्या वेळेस तो चांगला उडून किल्याचा अर्धा बुरूज कोसळून पडला. नंतर मराठ्यांनी पुनः हल्ला केला; परंतु पोर्तुगीज लोकांनीं मातीच्या टोपल्या भिंतीसारख्या रचिल्या आणि त्यांजवर तोफा ठावून याही वेळेस मराठ्यांचा हल्ला फिरविला. तत्रापि, पोर्तुगीज लोकांजवळ दारूगोळा फार थोडा शिलक राहिला असून खाण्यापिण्याचे पदार्थ तर संपतच आलेहोते. त्या कारणामुळें कसा तरी ठराव करून आपले जीव जगवावे ह्मणून त्या लोकांनीं कांहीं शर्तीनीं किल्ला स्वाधीन करूनदेण्याविषयीं पेशव्यांशीं बोलणें लाविलें. तें बोलणें मान्य झाल्यावर पोर्तुगीज लोक आपल्या मुलाबाळांनिशी जाहाजांत बसून निघून गेले. नंतर मराठे लोकांनीं किल्यांत प्रवेश केला. या लढाईत पोर्तुगीज लोकांकडील मेलेले व जखमी मिळून आठशांहून जास्त झाले नाहींत, कारण ते युद्धाचे कामांत बरेच कुशल असून शिवाय किल्याच्या आश्रयानें लढत होते. मराठे लोकांकडे माणसांचें नुकसान पांच हजारांवर झालें. *

हा जय झाल्यावर पुढें कोंकणप्रांत निर्वेध ताब्यांत येण्याकरितां विठ्ठल शिवदेव यांनीं बरोबर एक जय्यद फौज घेऊन समुद्रकिनाऱ्यावरील साष्टी, कल्याण, वगैरे ठिकाणांवर हल्ले केले आणि पोर्तुगीज लोकांशीं लढाया करून तीं सर्व ठिकाणें काबीज

---

* ग्रांडडफकृत मराठ्यांचा इतिहास.

केली; आणि पोर्तुगीज लोकांस हांकूनदेऊन सर्व कोंकण प्रांतांत पेशव्यांचा अंमल बसाविला. *

सन १७४० इसवी सालीं बाजीरावसाहेब उदेपूर, जयपूर, बुंदी, कोटा वगैरे ठिकाणचे रजपूत राजांबरोबर गुप्त स्नेह करून सर्वांच्या ऐक्यानें उत्तर हिंदुस्थानांतील मोघलांची सत्ता अजीबात नाहींशी करण्याची मसलत करण्याकरितां त्या प्रांतीं गेले. त्याही वेळेस विठ्ठल शिवदेव हे त्यांजबरोबर होते. बाजीराव साहेब साताऱ्याहून निघालें ते सत्तावीसाव्या दिवशीं हिंदुस्थानांत धन्नापन्ना यास जाऊन पोहोंचलें. या सत्तावीस दिवसांत त्यांनीं घोड्यावरचें खोगीर देखील उतरिलें नाहीं. वरसांगितलेल्या रजपूत राजां पैकीं विशेषेंकरून छत्रपूरचा राजा छत्रसाल हा नुकताच मरण पावला असून त्याचे दोन पुत्र जगदेव व हरदेसा असे होते; त्यांजबरोबर बाजीराव साहेबांचा विशेष स्नेह जडला. या दोन राजांचे वडिलावर बाजीरावसाहेब यांनीं सन १७३३ इसवी सालीं बंगष यास बुंदेलखंडांतून हाकून देण्याचे कामांत महदुपकार केले होते, ते त्या उभयता बंधूनीं स्मरून, आपल्या पित्यानें बाजीराव साहेबांसाठीं जो तेहतीस लक्षांचा मुलुक ठेविला होता तो त्यांचे स्वाधीन केला आणि परस्परांनीं परस्परांस साह्य करण्याच्या शपथा करून करारमाना केला. त्यांतील शर्ति येणेंप्रमाणें:—

१. त्या उभयतां बंधूंनीं यमुना आणि चंबेल यांचे पलीकडचा मुलुक खेरीज करून बाकी सर्व मुलुकांवरील स्वाऱ्यांत बाजीराव साहेबांबरोबर जाऊन आपल्याबरोबरच्या फौजेच्या मानानें सर्व लुटींत आणि जिंकलेले मुलुकांत वांटणीदार व्हावें.

२. बाजीरावसाहेब दक्षिणेंतील युद्धांत गुंतले म्हणजे त्यांबंधूंनीं बुंदेलखंडाचा किमानपक्ष दोन महिनेपर्यंत तरी बचाव करावा.

---

* विंचूरचे दफतरांतील बखर.

३. छत्रसाल राजे यांनीं बाजीरावसाहेब यांस पुत्राप्रमाणें मानिलें होतें ह्मणून बाजीरावसाहेबांनीं त्यांच्या त्या दोन पुत्रांचें बंधुप्रमाणें रक्षण करावें.

या वेळेस निजाम-उल-मुल्काचा पुत्र नासिरजंग हा औरंगाबादेजवळ थोड्या फौजेनिशीं होता. तीखबर बाजीराव यांस लागल्यावरून त्यांनीं तेथें मोठ्या त्वरेनें येऊन त्या राजपुत्रास एकाएकीं घेरिलें. परंतु त्यास वेळेवर कुमक आल्यामुळें मोठी लढाई झाली. त्या लढाईत विठ्ठल शिवदेव यांनीं शूरत्वाची कमाल केली. शेवटीं मुंगीपैठण येथें तह ठरला. त्यांत निजामानीं पेशव्यांस नर्मदेच्या कांठीं दोन माहाल व चांदवड परगण्यांतील कांहीं गांव जाहागीर दिले. पैकीं चांदवड माहालांतील गांव पेशव्यांनीं विठ्ठल शिवदेव यांचे पागेचे खर्चाकडे लावून दिले.

नंतर बाजीराव साहेब पुनः हिंदुस्थानांत जाण्यास निघाले; परंतु नर्मदेच्या कांठीं एकाएकीं त्यांची प्रकृति बिघडून ता. २८ एप्रिल सन १८४० इसवी रोजीं त्यांस देवाज्ञा झाली.

सन १७४१ इ० सालीं बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांस शाहूमाहाराजांनीं पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. पण मध्यंतरीं नानासाहेब यांस तीं वस्त्रें देऊंनयेत अशी नागपूरचे रघोजी भोसल्यांनीं माहाराजांस भीड घातलीहोती. त्यांनीं माहाराजांस गुप्तपणें असे सांगितलें होतें कीं, " येथें बापूजीनाईक बारामतीकर ह्मणून एक मराठे श्रीमंत गृहस्थ आहेत; त्यांस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं तर ते आपणांस पुष्कळ पैसा देतील. " पण दाखविलेली लालूच तुच्छ मानून छत्रपतींनीं नानासाहेबांसच मुख्य प्रधानकेलें. *

---

* ग्रांडडफकृत मराठ्यांचा इतिहास.

## प्रकरण ३.

### बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांचे कार्कीर्दीत विठ्ठल शिवदेव यांनीं केलेला पराक्रम.

---

सन १७४३ इसवी सालीं नागपूरचे रघोजी भोंसल्यांचे सेनापती भास्करपंत हे बंगालप्रांत सर करण्याचे इराद्यानें मुर्शदाबादेकडे कूच करून त्या प्रांतांत लूट करूंलागले असतां, त्या प्रांताचा बादशाही सुभेदार अलिमर्दाखान् यानें त्यांजवर पुष्कळवेळा हल्ले करून त्यांचे मोड केले; परंतु ते पुनःपुनः येऊन मुलुक लुटूं लागले. त्यामुळें त्यासुभेदारास पुष्कळ खर्च येऊन त्यास दिल्लीचे बादशाहास पाठविण्यास त्या प्रांतांतील काळींचे वसुला पैकीं कांहींच ऐवज राहात नसे. ह्या गोष्टीचा इतल्ला त्यानें बादशाहास केला. याचसंधीस बाळाजी बाजीराव पेशवे हे बादशाहापाशीं माळव्याची सनद मागत होते. त्यांस बादशाहानें असें कळविलें कीं बंगाल सुभ्यांत जाऊन नागपूरचे जे मराठे तेथें लूट करितात त्यांस हाकून दिलें असतां तुम्हास त्या सुभ्याचे एक वर्षाचे वसुलाची चवथाई बक्षिस देण्यांतयेईल व त्याशिवाय माळव्याची सनद ही देण्यांत येईल. नागपूरचे रघोजीभोसले यांनीं पूर्वी सन १७४१ इ० सालीं पेशव्यास पेशवाईचीं वस्त्रें देऊंनये असा शाहू माहाराजांस आग्रह केला होता; त्यामुळें त्यांजविषयीं पेशव्यांचे मनांत शत्रुभाव होताच; तशांत त्यांस (भोसल्यांस) बंगाल्यांतून हाकून देण्याविषयीं पेशव्यांस बादशाहाची सूचना झाली, तेणें करून त्यांस भोसल्यावर स्वारी करण्यास योग्यकारण होऊन त्यांनीं साठ हजार फौजेनिशीं प्रयागावरून बंगाल्यांत कूच केला. या स्वारींत नाना साहेब पेशव्यांबरोबर विठ्ठल शिवदेव हे होते. पेशव्यांनीं भोसल्यांस बंगालचे दक्षिणेकडील सरहद्दीवर गांठून त्यांचे फौजेवर झपाट्यानें हल्ला केला, आणि त्यांचा मोड करून त्यांस

बंगाल्या बाहेर हाकून लाविलें. * नंतर पेशवे नाना साहेब यांनीं कटक प्रांतांत शिरून तेथें अमल केला आणि भोसले यांचे गोंडवण वगैरे प्रांतांपासून खंडण्या घेऊन ते माळव्यास परत आले. या संपुर्ण मोहिमेंत विठ्ठल शिवदेव यांनीं आघाडीच्या कामगिऱ्या बजाविल्या असून मुख्यत्वेंकरून त्यांच्याच बाहादुरीमुळें पेशव्यांचा हरएक लढाईंत जय झाला. सबब नानासाहेब यांस दिल्लीचे बादशाहाकडून माळव्याची सनद मिळून त्यांत त्यांचा अमल पूर्णरीतीनें बसल्यानंतर त्यांनीं विठ्ठलशिवदेव यांस उत्तर हिंदुस्थानांत फौजेचे खर्चाकरितां अकरा माहाल सरंजाम करून दिले व शिवाय पुणें प्रांतीं रासें व मांडकी या नावांची दोन गांवें त्यांच्या जात सरंजामास लावून दिलीं. †

वरलिहिल्याप्रमाणें पेशवे यांजकडून नागपूरचे भोसले यांचा मोड झाला; परंतु तेणें करून त्यांचें पेशव्याशीं वैर वाढून त्यांनीं पुण्यावर स्वारी करण्याची तयारी चालविली आणि दक्षिणेंत जे कितीएक मराठे सरदार पेशव्यांस प्रतिकूळ होते त्यांस आपले साह्य संकेती करून घेतलें. ह्या प्रमाणें आपसांत लवकरच मोठी लढाई होण्याचा संभव दिसूं लागला; परंतु शाहू माहाराज मध्यें पडले आणि त्यांनीं उभयतांस स्वाऱ्या करण्याकरितां निरनिराळे मुलुक नेमून देऊन पृथक सनदा करून दिल्या; तेणें करून उभयतांचा समेट झाला.

सन १७४४ इ० सालीं विंचूर येथें नंदाजी दरेकर या नांवाच्या एका मराठे पेंढाऱ्यानें दंगा केला होता. तो मोडण्यासाठीं पेशव्यांनीं विठ्ठलशिवदेव यांस पाठविलें असतां, त्यांनीं त्या पेंढाऱ्यावर जाऊन रात्रीं विंचूर येथें त्याजवर छापा घातला; आणि त्यास कत्तलकरून तेथें आपला अंमल चालूकेला. त्या बाहादुरीबद्दल

* ग्रांट डफ कृत मराठ्यांचा इतिहास.

† विंचूरचे दफ्तरांतील जुनी बखर.

पेशव्यांनीं विठ्ठल शिवदेव यांची मोठी वाहवा करून त्यांचे पतकाचे गुजाऱ्यास उत्तर हिंदुस्थानांत पूर्वी जो सरंजाम दिलाहोता त्यांत विंचूर हें गांव सामील करूनदिलें. ह्याच वेळेस विंचूर गांवचें पाटीलकीचें वतन ही विठ्ठलशिवदेव यांस वंशपरंपरेनें मिळालें. त्या वेळेपासून विठ्ठल शिवदेव हे विंचूरयेथें वाडाबांधून राहूं लागले., व त्याच कारणानें त्यांस विंचूरकर असें लोक ह्मणूं लागले.

पुढें सन १७४९ इसवी सालीं शाहू माहाराज आपला सर्व राज्यकारभार बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांचे स्वाधीन करून कैलासवासी झाले. नंतर पेशवे हे पुणें शहर संपूर्ण मराठी राज्याची राजधानी करून तेथें राज्यकारभार चालवूं लागले. तेथें बाजीराव साहेब पेशवे यानीं शनवारचा वाडा पूर्वीच कांहींसा बांधिला होता. त्याची नानासाहेब यांनीं पूर्णता केली आणि पदरच्या बहुतेक सरदारांस व इतर लोकांस निरनिराळ्या जागा नेमूनदेऊन तेथें आपले वाडे बांधण्याची त्यांस परवानगी दिली. विठ्ठल शिवदेव यांसही शनवार पेठेंत श्री ओंकारेश्वराचे देवळाचे दक्षिण बाजूस जागा मिळाल्यावरून त्यांनीं तेथें वाडा बांधिला. त्यांचा मुक्काम पुण्यांत असला ह्मणजे ते त्यावाड्यांत राहात, आणि त्यांचे फौजेचा तळ नदीचे उत्तरेकडील किनाऱ्याजवळ पडत असे. वरलिहिल्याप्रमाणें पेशवे यांजकडून सरदार, मानकरी आणि सावकारलोक यांस पुण्यांत वाडे बांधण्याची परवानगी मिळाल्यावरून तेथें पुष्कळ मोठमोठाले वाडे होऊन वस्ती झपाट्यानें वाढूं लागली, आणि जेंपुणें पूर्वी कसबें म्हणवीत होतें तेंपुणें पुढें शहर म्हणवूंलागलें.

शाहू माहाराजांचें दफ्तर त्यांचे चिटणीस ठेवीतअसत.त्यांत जमाखर्च वगैरे कारकुनी लिहिणें असे. परंतु राज्य दिवसांदिवस वाढत चाललें असतां, पुढें लिहिणें कसें ठेवावें हा प्रश्न येऊन पडला. त्या काळीं लिहिणारे ह्मटले म्हणजे विशेषेंकरून परभू व शेणवे

हेच असत, कारण, शिवाजीमाहाराजांपासून मुत्सदी, अमलदार आणि कारखानदार परभूच असत, पण त्यांच्या आंगीं मोठ्या राज्यास आळा घालण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्यावेळेस राज्याचा किल्ला काय तो मोघलांचाच होता. याकरितां पेशव्यांनीं दिल्लीहून दोन मुनशी पुण्यास आणविले आणि त्यांपासून मोघलाई पद्धतीचे नमुने लिहून घेववून त्याप्रमाणें राज्याची पद्धत चालू केली. ती अशी कीं, सरसुभे, दरकदार, हुजूरचे दिवाण, फडनवीस, मजमदार, वगैरे हुद्देदार नेमिले, आणि असें ठरविलें कीं मजमदार यानीं सरसुभे आणि सरदार यांचे दफ्तरदार नेमावे. पेशवाईत पुणें, कोंकण, नगर, खानदेश, गुजराथ, आणि करनाटक हे सरसुभे होते. शिंदे, होळकर, वगैरे सरदार होते. त्यांजपाशीं हुजूरचे दरकदार असत. त्यांचे विद्यमाने हुजुरास हिशेब येतअसत. हुजूर जें मोठें दफ्तर होतें त्यास "फड" असें म्हणत असत. त्या फडावर कोंकणचे ब्राम्हण लिहिणें शिकून राहूंलागले. त्याकाळीं बाळाजी बाजीरावपेशवे यांचें मोडीचें अक्षर उत्तम होतें, म्हणून ते कोकणस्थ ब्राम्हणांस स्वतः किते घालून देऊन विद्यावृद्धीस उत्तेजन देत असत.

सन १७५२ इ० सालीं नानासाहेब व भाऊसाहेब हे विठ्ठल शिवदेव यांस फौजेसुद्धां बरोबर घेऊन कर्नाटकचे स्वारीस गेले. प्रथम त्यांनीं श्रीरंगपट्टणास जाऊन तेथील राजापासून खंडणी घेतली. त्या स्वारींत विठ्ठल शिवदेव यांनीं होळिहोनूर किल्ला मोठ्या जुर्रतीनें सर केला. ही मोहिम करून पेशवे पुण्यास परत आल्यावर सन १७५३ इ० सालीं नानासाहेब पेशवे यांचें मनांत आलें कीं, आपले कनिष्ट बंधू राघोबादादा यांस प्रांतांतून स्वारीस पाठवित जावें; म्हणजे त्यांच्या चपल मनांत पराक्रम करण्याची उम्मेद उत्पन्नहोईल, आणि आपणास निष्काळजी राज्यकारभार पाहाण्यास व त्यांत सुधारणा करण्यास ठीकपडेल. नानासाहेब

हे आपल्या वडिलांप्रमाणें मेहेनती नसत असें इतिहासांत सांगितलें आहे. राघोबादादा मात्र शूर असून फार चालाख असत. स्वारींत पंचवीस-तीस कोसांचे मुक्काम करणें हें चापल्य त्यांच्या आंगी सहजीं होतें, ह्या त्यांच्या चंचल वर्तनावरून शिपाई लोक त्यांस "राघोबा भरारी" असें ह्मणतअसत. असो; नानासाहेबांनीं सखारामबापू यांस राघोबादादांचे कारभारी नेमून विठ्ठल शिवदेव यांस त्यांच्या सर्व फौजेचें आधिपत्य दिलें. याप्रमाणें त्यांनीं योजना करून गुजराथच्या स्वारीवर राघोबादादांची नेमणूक केली.

राघोबादादांची स्वारी गुजराथेंत शिरल्यावर प्रथम त्यांनीं सुरतेचें ठाणें मारून तेथें आपला अमल बसविला. नंतर त्यांनीं ठिकठिकाणीं ठाणीं बसवून उरपाड माहाल विठ्ठल शिवदेव यांनीं सर केला होता म्हणून त्यामाहालाची वहिवाट त्यांचेच हवालीं केली. परंतु ह्या दुसऱ्या कामांस दिवसगत लागल्यामुळें अहमदाबाद शहर घेण्याचें जें मुख्यकाम तें नेमलेले वेळेवर झालें नाहीं. ह्मणून राघोबादादांचे मदतीसाटीं तावडतोब जाण्याविषयीं पुण्याहून दत्ताजी शिंदे यांस हुकूम लिहून गेला. ही बातमी राघोबादादा यांस कळल्यावर ते व सखारामबापू यांनीं विठ्ठल शिवदेव व नारो शंकर राजेबाहादर यांस बोलवून सांगितलें कीं "शिंदे येण्यापूर्वी अहमदाबाद शहर व किल्ला हस्तगत झाला तर आपला नक्षा राहील; नाहीं तर ते यशाचे वांटेकरी होतील." तें ऐकून उभय सरदारांनीं शिंदे येण्यापूर्वी किल्ल्यासुद्धा अहमदाबाद शहर सरकरण्याचा पत्कर घेतला, आणि लागलीच आपापल्या फौजांची तयारी करून किल्ल्यावर चाल केली. हें वर्तमान मोघल बादशाहाचा सुभेदार जवांमर्दखान बाबी यास कळतांच त्यानें मोठ्या शौर्यानें त्यांचा सामना केला; परंतु त्याचा अगदीं मोड होऊन त्यास पळून जावें लागलें, आणि शेवटीं किल्ला व शहर विठ्ठल

शिवदेव व नारो शंकर यांनीं सरकरून त्यावर पेशव्यांचा झेंडा उभा केला. नंतर जंबामर्दखान याने रघुनाथराव यांशीं तहाचें बोलणें लाविल्यावरून त्यांनीं उदारमनानें त्याजकडे पट्टन, राधनपूर वगैरे परगणे कायम ठेविलें. * नानासाहेब पेशवे यांचे हुकुमावरून दत्ताजी शिंदे पुष्कळ फौजेनिशी कोंडाई बारींतून रघुनाथराव यांचे मदतीस त्वरेनें चालले होते; परंतु त्यांस त्याजयांचें वर्तमान मार्गात समजल्यावरून ते अहमदाबादेस सावकाशीनें जाऊन पोंहोचले. ह्या मोठ्या जयामुळें संपूर्ण गुजराथेंत पेशव्यांचें तेज पडून त्यांतील राजे रजवाडे यांजवर दरारा बसला. याच वेळेस विठ्ठल शिवदेव यांस रघुनाथराव यांनीं अहमदाबाद येथें सातशें रुपयांच्या दरकी असाम्या करून दिल्या व नारो शंकर राजे बाहादर यांजकडे ही जंबुसर माहालाची वहिवाट सांगितली. ह्या सर्व गोष्टी रघुनाथराव यांनीं नानासाहेब पेशवे यांस लिहून कळविल्यावर त्यांनीं त्यांस उत्तर हिंदुस्थानचे स्वारीस जाण्यांविषयीं हुकूम पाठविला. वरलिहिलेल्या मोहिमेंत दमाजी गायकवाड हे रघुनाथराव यांजबरोबर होतेच. त्यांजकडे गुजराथ प्रांताचा बंदोबस्त सोंपूनदेऊन रघुनाथराव हे पुढें मेवाडाकडे चालते झाले.

रघुनाथराव उत्तरहिंदुस्थानचे हद्दींत गेल्यावर मल्हारराव होळकरांचे पुत्र खंडेराव हे त्यांस येऊन मिळाले. मग हें संपूर्ण मराठी लष्कर अजमीर प्रांतांत शिरलें. तेथें रघुनाथराव यांनीं चौथ व सरदेशमुखी वसूल केल्यावर ते तेथून खंडण्या घेत घेत भरतपूचे जाटराजाचा कुंभेरी नांवाचा किल्ला याजजवळ पोंहोंचले. जाटराजानें त्यांस खंडणी देण्याचें नाकबूल केल्यावरून रघुनाथराव यांनीं त्या किल्ल्यास वेढा घालून त्याजवर तोंफांचा भडिमार चालविला. या लढाईंत खंडेराव होळकर पडले; परंतु शेवटीं जाट राजास पेशव्यानां खंडणी देणें भागपडलें.

---

* ग्रांडडफकृत मराठ्यांचा इतिहास.

रघुनाथराव यांचा तळ कुंभेरीजवळ असतां, त्यांस दिल्लीचे बादशाहचा वजीर मीरशाबुद्दीन यानें दिल्लीस येण्याविषयीं विनंती लिहिली; त्यावरून ते तिकडे जाऊन संपूर्ण मराठी लष्कराचा तळ त्या शहराजवळ पडला. त्यांतच विठ्ठल शिवदेव यांचे फौजेचा गोट होता.

कुंभेरीस वेढा असतां विठ्ठल शिवदेव यांची पत्नी रखमाबाई यांस देवाज्ञा झाली. पुढें दिल्लीस स्वारी गेल्यावर वधूचा शोध करण्यास्तव विठ्ठलराव यांनीं कालपी वगैरे ठिकाणीं कारकून रवाना केले. त्यांनीं कालपीसच वधू पाहून लग्नाचा निश्चयकेल्यावर विठ्ठलराव यांनीं सडया स्वारीनिशीं तेथें जाऊन लग्न केलें. हें लग्न यमुनातीरीं झाल्याकारणानें या स्त्रीचे नांव यमुनाबाई असें ठेवण्यांत आलें. * नंतर ते दिल्लीस परत जाण्यास निघाले. वाटेनें त्यांचा मुक्काम ग्वाल्हेरीजवळ झाला. त्या वेळेस त्यांच्या फौजेंतील कांहीं स्वार, कही करण्यास (घोडयांस चंदी वैरण वगैरे सरंजाम मिळविण्यास) गेले असतां त्यांची व जाट राजाचे एके टोळीची गांठ पडून तिनें त्या स्वारांस कही कर्ण्याची मनाई केली. त्यावरून उभयतांची चकमक झडली. तींत विठ्ठलराव यांजकडील कांहीं स्वार मारले जाऊन बाकीचे जाटलोकांनीं धरून नेले. तेस्वार सोडविण्याकरितां विठ्ठलराव यांनीं जाट राजाकडे वकील पाठविला; परंतु त्या वकिलाची आणि राजाची भेट न होतां त्याचे दिवाणाचीभेट झाली. उभयतांचें बोलणें झालें त्यांत त्या वकीलास दिवाण म्हणाला कीं, "तुह्मांस कुंभेरीस जय मिळाला त्यामुळें तुह्मी फार चढलां आहांत आणि आम्हांसारख्या शूर जाटांच्या राज्यांत शिरून निर्भयपणें वर्तन करितां हें तुमच्या नाशाचे कारण आहे. तुह्मी ब्राह्मण, शूरत्व हा विषय तुमचा नव्हे! तुमचे मालिक पेशवे यांस आम्ही जाणतों. त्यांचे तुम्ही सरदार आहां. तुम्हांस ही आम्ही ओ-

* विंचूरचे दफ्तरांतील जुनीबखर.

ळखतो. आतां जर तुम्हांस कैद केलेले स्वार सोडवावयाचे असतील तर, तुम्हीं आमचे राजधानींत परवानगीवांचून मुक्काम केला त्याबद्दल अगोदर माफी मागा; म्हणजे आमचे राजे तुम्ही ब्राम्हण म्हणून तुम्हांस माफी देतील आणि तुमचे जे स्वार कैदेंत आहेत त्यांस ही सोडूनदेतील." हें भाषण ऐकून वकील परत गेला आणि त्यानें सर्व मजकूर विठ्ठलरावांस कळविला. तो ऐकून विठ्ठलराव यांस अत्यंत त्वेष येऊन त्यांजपाशीं जी काय थोडीशी फौज होती तिजवरील हुद्देदारांस त्यांनीं लढाईचे तयारीचा हुकूम केला; आणि आपण ही स्वतः तयार झाले. त्यांची फौज दिल्लीस होती ती त्यांनीं तोफखान्यासहित तेथें बोलविली; आणि नवीन फौजेची भरतीकरण्यास्तव कलमजारी करून थोड्याच दिवसांतजाटाशीं लढाई सुरूकेली आणि दिल्लीची फौज आल्यावर ग्वाल्हेरचे किल्यास वेढा घालून किल्याबाहेर जाण्यायेण्याचे सर्व मार्ग बंद केले आणि मोर्चे बांधून किल्यावर तोफांचा मारा सुरू केला. तो पाहाडी किल्ला बहुत मजबूत असून जाट शिपाईही मोठे कट्टे लढणारे असल्यामुळें दक्षिणी फौजेचा कांहीं इलाज चालेना. लढाईस तीन महिने गुजरल्यावर दिल्लीहून सखारामबापू यांचे सल्यानें राघोबादादा यांजकडून विठ्ठलराव यांस असा हुकूम आला कीं, "जाटाबरोबर लढाई सुरू करण्यास तुह्मीं आज्ञा घेतली नाहीं व किल्ला कोणते प्रकारचा आहे याचा विचार मनांत न आणितां एकदम लढाई चालूकेली हा वेडेपणा केला आहे. आतां या युद्धास जो खर्च होईल तो तुह्मांस सरकारांतून मिळणार नाहीं व शेवटीं अपयश येईल त्याबद्दल तुम्हांपासून सरकार सक्तीनें जबाब घेईल." हा सर्व मजकूर राघोबादादांनीं पुण्यास नानासाहेब पेशवे यांस ही लिहूनपाठविला. विठ्ठलराव यांस हा हुकूम पोहोंचला. तथापि धैर्य न सोडितां त्यारात्रीस आपल्या फौजेंतील सर्व सरदार एकत्र करून ते त्यांस म्हणा-

ले कीं, "अजूनही किल्ला हस्तगत न होईल तर लढाईंत मरून जाणें बेहेत्तर आहे; जय झाल्याशिवाय मालिकांस तोंड दाखविणें बाजवी नाहीं." त्याजवर आपाजी मुढे बोलले कीं, " उदईक बेलाशक हल्ला करावा. मी आघाडीस जातो आणि सुरुंग लावून किल्ल्याचा दरवाजा उडवून देतों. तुह्मी मागोमाग हल्ला करून किल्ला स्वाधीन करून घ्यावा." याप्रमाणें बेत टरल्यावर विठ्ठलराव यांनीं सूर्योदयापूर्वी स्नानसंध्या केली आणि आपला कुलस्वामी नरहरी यास नमस्कार करून असा पण केला कीं, "आज मी हा किल्ला सरकरीन किंवा लढाईत आपला प्राण खर्ची घालीन." नंतर दृढ निश्चयानें बाहेर निघून त्यांनीं हल्ल्याची सुरुवात केली. दोन प्रहरचे सुमारास आपाजी मुढे हे किल्याचे दरवाज्या जवळ जाऊन पोंहों- चले. या बिकट समयीं निकराची लढाई करून जय मिळविला पा हिजे असें जाटांस वाटलें. तेव्हा त्यानीं किल्याचा दरवाजा एकदम खुला करून हल्लाकरणारे लोकांवर झपाट्यानें चाल केली. मराठी फौजे- चा ही दृढनिश्चय झालाच होता. त्यामुळें तुमुल रण माजून जाटांनीं मराठ्यांचा हल्ला मार्गे फिरविला. हें विठ्ठलराव यांनीं मागून पाहि- ल्यावरून त्यांस अत्यंत त्वेष चढला व त्यांनीं तरवार खेचून झपा- ट्यानें शत्रूवर चाल केली. त्या संधीस बंदुकांचा मारा बंद झाला आणि दोहींकडील दळें हातघाईवर येऊन परस्परें मोठा दारूण युद्धसंग्राम झाला. विठ्ठलराव हे स्वतः शत्रूवर तुटून पडले. तें पाहून माहादजी शितोळे, यमाजी रवळेकर आणि मोतीराम * ब्राह्मण, तसेंच सर्व मानकरी, यांनीं घोड्यावरून उड्या टाकून झपाट्यानें हल्ला केला आणि ती सर्व गर्दी जाट राज्याच्या घोड्या पर्यंत जाऊन पोंहोंचली. तेव्हां माहादजी शितोळे यांनीं पुढें सर- सावून त्या राजास घोड्यावरून खालीं पाडिलें आणि त्याच संधीस

---

* हा जातीचा कनौजिया ब्राह्मण असून लढाईत घोड्यावर पाण्याच्या झाऱ्या बाळगून विठ्ठलराव यांस ताहान लागेल तेव्हां पाणी पाजीत असे.

विठ्ठलराव यांनीं त्याचे छातीवर पाय देऊन तरवारीचे एकाच हातानें त्याचे शीर उडविलें. त्या दुर्घट रणकंदनांत मराठी फौजेनें शेवटीं जाटाचे फौजेची मोठी कत्तल उडवून किल्ला सरकेला आणि तेथें पेशव्यांचा झेंडा उभा करून चांगला बंदोबस्त ठेविला. किल्ल्यावर बाहुटा चढला त्यावेळेस संध्याकाळचा चार घटका दिवस उरला होता. हा मोठा जय झाल्यावर विठ्ठलराव यांनीं जखमी झालेल्या वीरांच्या जखमा शिवण्याचा वगैरे बंदोबस्त करून माहादजी शितोळे, यमाजी रवळेकर आणि आपाजी मुंढे यांस सोन्याचीं कडीं आणि उंची पोषाग देऊन त्यांची मोठी बडेजाव केली व पेशवे यांस विनंति करून निरंतर चालणारीं इनामें देवविण्याविषयीं त्यांस वचनें दिलीं. त्याप्रमाणेंच मोतीराम ब्राम्हण यांसही बक्षिस देऊन त्यादिवसापासून त्यास फौजेंतील एक हुद्देदार केलें. ही सर्व व्यवस्था इकडे चालली असतां, जाट राजाचा पुत्र राजा गिरधर हा कारभारी मंडळीसुद्धां विठ्ठल शिवदेव यांस शरण आला. तेव्हां विठ्ठलरावांस मोटा संतोष होऊन त्यांनीं त्या मुलास आश्वासन दिलें आणि ज्या दिवाणानें पूर्वी बेअादबीचीं भाषणें केलीं होतीं त्यास बोलावून असें विचारिलें कीं, "आतां शूरत्व हा ब्राम्हणाचाविषय आहे किंवा कसें. ?" या प्रश्नानें तो कुंटित होऊन स्तब्ध बसला. नंतर ग्वाल्हेरचा किल्ला, ग्वाल्हेर शहर आणि त्याखालचा मुलुक असें विठ्ठलरावांनी आपले मालिक पेशवे यांजकरितां ठेवून घेतलें आणि बाकीचें गोहोद संस्थान राजा गिरधर यास बाहाल करून त्यास परत जाण्याची परवानगी दिली; तसेंच नवीन जिंकिलेल्या किल्ल्याची व मुलुकाची वहिवाट गोविंद शामराज शिरवळकर यांस सांगून लढाईचे आरंभीं ज्या जाग्यावर तोफा मारण्यासाठीं मोर्चे बांधिले होते, तेथें देऊळ बांधून त्यांत मारूतीची मूर्ति स्थापन केली. ती मूर्ती आद्यापपर्यंत कायम असून तीस " मोर्च्याचा मारूती " असें म्हणतात. याप्रकारें किल्यासह ग्वाल्हेर प्रांत सरकरून विठ्ठल शिवदेव हे राघो-

बादादांचे छावणींत जाऊन मिळाले. नंतर राघोबादादांनीं उत्तर हिंदुस्थान प्रांतांत बंदोबस्त ठेवण्याकरितां जनकोजी शिंदे यांस ठेवून मल्हारराव होळकर आणि दत्ताजी शिंदे यांस माळव्यांत ठेविलें; व आपण विठ्ठल शिवदेव व इतर सरदार यांसुद्धां पुण्यास परत आले.

विठ्ठल शिवदेव यांनीं सदाशिवरावभाऊंची भेट घेतल्यावर त्यांस ग्वाल्हेरच्या लढाई संबंधी सर्व हकीकत कळवून, "फौजे बद्दल बारालक्ष रुपये देण्याचे पेचांत मीं आहें, त्याची मेहेरबानगीनें मिसल लाऊन द्यावी." अशी त्यांस विनंती केली. तेव्हां भाऊसाहेब हे त्याबद्दल त्यांस दूषण देऊन म्हणाले कीं, "आज्ञेवांचून ग्वाल्हेरची मसलत तुम्हीं कशासाठीं केली. ? आतां हा खर्च तुम्हांस मिळणार नाहीं." विठ्ठल शिवदेव हे कर्जाचे पेंचामुळें फारच उदासीन झाले होते. त्यांतून सदाशिवरावभाऊ जेव्हां असें रागानें बोलले, तेव्हां तर त्यांस फारच वाईट वाटलें. शिवाय भाऊंच्या त्या बोलण्यानें फौजेंत बेबंदी होऊन घोटाळा होऊं लागला. तें पाहून नानासाहेबांनीं विठ्ठल शिवदेव यांस एकांतीं बोलावून सांगितलें कीं, "तुम्ही घाबरे होऊं नका; तुमचे मर्जीप्रमाणें देण्याचा फडशा करून टाकूं." यावरून असें दिसतें कीं, सदाशिव-राव भाऊंचा वचक नानासाहेबांस देखील बाळगावा लागत असे. !

आतां यापुढें कर्नाटकाच्या स्वारीचा वृत्तांत सादर करावयाचा आहे. पण वाचकांची समज बरोबर व्हावी म्हणून कांहीं मज-कूर उपोद्घातासारखा येथें लिहितों. सांप्रत आम्ही ज्या काळाचा इतिहास लिहित आहों त्या काळीं संपूर्ण हिंदुस्थानांत अनेक राज्यें असून नवेनवे योद्धे व नवेनवे उमेदवार ही पुष्कळ उत्पन्न होत होते. त्या वेळेस या देशांत शिपाईगिरीचा धंदा मुख्य होऊन गेला होता. तसेंच प्रत्येक राजास आपला अधिकार व मुलुख वाढ-विण्याची इच्छा असल्यामुळें जागोजाग राजकारणें होत होतीं. त्याचप्रमाणें एका राजाचे हक्कास दुसरे राजाकडून कांहीं बाध आला कीं लागलीच त्याजवर स्वारी व्हावयाची. असा क्रम चा-

लत असल्याकारणानें सर्व देशभर हमेषा लढायाच चाललेल्या असत. याच संधीस पेशवे यांनीं कर्नाटकावर स्वारी केली. त्यास एक क्षुल्लक कारण झालें होतें; पण तेणेंकरून आपल्या हक्कास कमीपणा आला असें पेशव्यांस वाटून त्यांनीं सावनूरचे नवाबावर स्वारी केली. तें क्षुल्लक कारण असें:—पेंदेचरी येथें फ्रेंच लोकांचा सरदार मान्सीयर बुसी याचे फौजेंत मुजफ्फरखान नावांचा एक हुद्देदार होता. तो फ्रेंच पलटणींतून चाकरी सोडून सन १७५० इ० चे सुमारास पेशव्यांचे फौजेंत नौकरीस राहिला, व त्यानें कांहीं कवाइती फौज ही तयार केली. पुढें सन १७५१ इ. सालीं पेशव्यानीं माहादाजीपंत पुरंदरे यांच्या हाताखालीं जी फौज कर्नाटकांत पाठविली त्याच फौजेच्या मदतीस मुजफ्फरखान यास आपल्या कवाइती फौजेनिशीं पाठविलें. त्याचे ताब्यातील पलटणांच्या कामकाजांत माहादाजीपंत यांनीं कांहीं त्रास दिल्यामुळें त्यास राग येऊन तो पेशव्यांची चाकारी सोडून श्रीरंगपट्टणास गेला; परंतु तेथें त्याची टांकी न लागल्यामुळें पुढें तो सावनूरचे नबाबापाशीं राहिला आणि तेथें कवाइती फौज व तोफखाना तयार करूंलागला. हें वर्तमान नानासाहेब पेशवे यांस समजलें तेव्हां त्यांनीं तो मुसलमानसरदार आपले स्वाधीन करण्याविषयीं सावनूरचे नबाबास पत्र लिहिलें; परंतु त्यानें तो मनुष्य देण्याचें नाकबूल केलें. त्यानाकबुलीस नबाबाचे पुरातन साह्यकर्ते गुत्ती व सुंडुर येथील घोरपडे यांनीं अनुमोदन दिलें. त्यामुळें पेशव्यांस वैषम्य वाटून त्यांनीं मोठी फौज जमा केली. त्या फौजेचे मदतीस जानोजी भोंसले यांनीं दाहाहजार स्वार दिल्यामुळें ती फारच मोठी झाली. पेशव्यांचे फौजेंत मुख्य सरदार होते ते;—स्वतःनानासाहेबपेशवे, सदाशिवरावभाऊ, मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव व जानोजी भोंसले यांच्या स्वारांवरील सरदार, याप्रमाणेंहोते. या एकत्र झालेल्या फौजेनें कृष्णानदी उतरून प्रथम बागलकोट किल्ला घेतला; मग सावनूरावर

हल्ला करण्यास्तव तीनें पुढें कूचकेला. हैदराबादचा मुख्य वजीर शाहानवाजखान यानें त्या वेळेस कांहीं एका विशेष कारणास्तव पेशव्यांबरोबर गुप्त बोलणें चालविलें होतें. त्यानें पेशव्यांची ही मोठी भयंकर फौज जमलेली पाहून त्याचे मनांत भय उत्पन्न झालें; परंतु त्यानें तें लपवून कृष्णानदीवर देखरेख ठेवण्याकरितां म्हणून एक फौज तयार केली. हें वर्तमान पेशव्यांस कळलें तेव्हां " आमचा इरादा शत्रुत्वाचा नसून मित्रत्वाचा आहे. " असें त्या वजिरास कळविण्याकरितां त्यांनीं त्याजकडे वकील पाठविला. त्या वकिलानें वजिरास असें कळविलें कीं, " सावनूरच्या नबाबाचें वर्तन उभय राजांशीं ह्मणजे तुमच्याशीं आणि आमच्याशीं शत्रुत्वाचें असून त्याचा अधिकार आतांच न तोडला तर तो संपूर्ण कर्नाटक काबीज करील. यासाठींच त्याजवर स्वारी केली असून आपणही अशा वेळेस आम्हास ( पेशव्यांस ) मदत करावी. " त्या वजिरानें वकिलापाशीं मदत देण्याचें कबूल केलें, व मानसियर बुसी याजबरोबर साह्यसंकेत करून जी मराठे लोकांची फौज सावनूरचे किल्यास वेढा घालीत होती तीस मदत करण्यास्तव त्यास तिकडे पाठवून दिलें.

वरलिहिलेली मदतीची फौज सावनुरापासून पंचवीस कोसांचे अंतरावर दाखल झाली. तेव्हां नानासाहेब पेशवे यांचे मनांत वारंवार अशी गोष्ट येऊं लागली कीं, " आपलेकडून सावनुरच्या नबाबाचें पारिपत्य होईना सबब हैदराबादेहून मदतीस्तव फौज आणविली असें लोक म्हणतील; आणि निजामाची मदत घेणें हें कृत्य तरी आपले शिपाईगिरिच्या बाण्यास दूषण लावणारेंच आहे. शिवाय, निजामाची फौज येऊन या युद्धांत कदाचित तिची मदत झालीतर एकंदर लाभांत निजामास वांटा द्यावा लागेल; यासाठीं ती फौज येऊन दाखल होण्यापूर्वीच सावनूर हस्तगत झालें तर फार चांगलें होईल; तर ही कार्यसिद्धि होण्यास काय युक्ति योजावी. ? " ही गोष्ट नानासाहेबांच्या मनांत घोळत

असतां; त्यांनीं मल्हारराव होळकर यांस बोलावून आपल्या मुत्सद्दी मंडळींत त्या गोष्टीचा विचार केला. त्या प्रसंगीं होळकर बोलले कीं, "थोर आणि प्रसंगीं उपयोगीं पडणारेमर्द असे विठ्ठलराव विंचूरकर हे आहेत; पण ग्वाल्हेर सरकरण्याचे कामीं त्यांचा पैसा खर्च झाला तो त्यांस मिळण्याची गोष्ट तर एकीकडेसच राहिली. ! उलटें, हुकुमाशिवाय जाटाबरोबर लढाई केली हा दोष मात्र त्यांस देण्यांत आला. ! या कारणानें ते उदास आहेत. त्यांस बोलावून त्यांची समजूत केली असतां, ते व मीं मिळून हल्ला करून किल्ला सर करूं." हे ऐकतांच नानासाहेब पेशवे यांनीं विठ्ठलराव विंचूरकर यांस बोलावून आणविलें आणि त्यांची बहुत प्रकारें समजूत करून त्यांस अज्ञा केली कीं, "निजामाची फौज येऊन पोंहोंचण्यापूर्वीं सावनूरचा किल्ला हस्तगत झालापाहिजे." ही आज्ञा ऐकून होळकर आणि विठ्ठलराव मोठ्या विरश्रीनें बोलले कीं, "यश येणें हें सरकारचे पुण्यप्रतापावर आहे. आमचें काम इतकेंच आहे कीं, स्वामिसेवेंत आपली पराकाष्टा करावी. ती करण्यास आह्मी सिद्ध आहों." नंतर श्रीमंतांनीं उभयतांस विडे देऊन रवाना केलें. विठ्ठलराव आपले गोटांत गेल्यावर त्यांनीं आपले सर्व सरदार आणि मानकरी यांस बोलावून दरबार केला आणि पेशव्यांबरोबर आपलें झालेलें भाषण त्यांस कळवून "उद्ईक हल्ला करून सावनूर घ्यावयाचें अथवा लढाईंत पडून स्वर्गप्राप्ती करावयाची."असा आपला दृढ निश्चय सर्वांस सांगितला. त्याजवर सर्व मानकरी व सरदार बोलले कीं, "आम्ही सर्व आपलीं शिरें खर्ची घालण्यास तयार आहों; हल्लयाची तयारि करावी." मग दुसरे दिवशीं पाहाटेस मागील चारघटका रात्रीस तयार असण्याविषयीं होळकर यांस सूचना पाठवून विठ्ठलराव यांनीं निद्रा केली; पण काळजीमुळें निद्रा लागली नाहीं. शेवटीं पाहाटेस उठून स्नान झाल्यावर विठ्ठलराव यांनीं कुळस्वामी नरसिंव्ह याची पूजा करून दिवाण भिमणाजी खंडेराव

यांजबरोबर नानासाहेब पेशवे यांस निरोप पाठविला कीं. " मीं आतां हल्लयावर जाणार; अस्तमानपर्यंत सावनूर हस्तगत करीन, नाहीं तर रणांत पडून स्वर्गास जाईन. " हा निरोप ऐकून श्रीमंतांस फार संतोष वाटला; आणि विठ्ठलराव यांचे मदतीस जाण्याविषयीं त्यांनीं दुसऱ्या फौजेस हुकूम केला. सूर्योदयापूर्वींच हल्लयास आरंभ झाला. इतक्यांत होळकर ही आपली फौज घेऊन हल्लयांत येऊन मिळाले. या दोन्हीं फौजा एकत्र होऊन शत्रूवर एकसारखे हल्लयाचे हल्ले चालले असतां, शत्रूकडूनहीं प्रत्येक हल्लयाचा प्रतिकार करण्यांत कसूर झाली नाहीं. सावनूरचे नबाबाकडील फ्रेंच सरदाराचे हाताखालीं शिकलेले अंमलदारांनीं या हल्लयाच्या वेळेस मराठी फौजेवर गोळ्यांची पर्जन्यासारखी वृष्टी केली. तथापि ती फौज कच न खातां कोटाचे दरवाज्यापर्यंत मोटया जुरतीनें जाऊन पोंहोंचली. नंतर हत्तीच्या गंडस्थळाच्या टकरेनें तो दरवाजा फोडून मराठे शहरांत घुसले. मग बिकट लढाईचा प्रसंग आला, तेव्हां विंचूरकर यांच्या पदरचे कितीएक जवांमर्द लोक पडले. मग विठ्ठलराव सर्व मानकऱ्यांसुद्धां घोडयावरून खालीं उतरून शत्रूवर पाण्याच्या लोटाप्रमाणें हल्ला करीत चालले. त्या दारुण रणसंग्रामांत कृष्णा नदीचे कांठावरील पांचवड येथें राहणारे सरजेखान व मत्तेखान या नांवाच्या उभयतां बंधूंनीं पुढें घुसूनजाऊन किल्लयावरील बावटा खालीं पाडिला आणि आपल्या पागोटयाचें निशाण करून त्या ठिकाणीं चढवून दिलें. तें पेशव्यांचे निशाण पाहातांच सावनूरच्या फौजेचें धैर्य अगदीं खचून तिनें पळ काढिला. या लढाईंत विठ्ठलराव यांचे खांद्यावर तरवारीची एक जखम लागली. नंतर त्यांनीं ठाणें बसविलें आणि चोहींकडे फौजेच्या टोळ्या पाठवून शत्रू नाहींसा केला. तेथें स्थिरस्थावर झाल्यानंतर उभयतां सरदार आपापले गोटांत गेले. पुढें शस्त्रवैद्यानें विठ्ठलराव यांची जखम शिवून तिला योग्य उपचार केले.

यांप्रमाणें अल्पकाळांत अत्यंत मोठा जयप्राप्त झाल्यामुळें नानासाहेब पेशवे यांस फारच संतोष झाला. त्यांनीं त्याच रात्रीं होळकरांस बरोबर घेऊन ज्या डेऱ्यांत विठ्ठलराव जखमी होते त्या डेऱ्यांत जाऊन त्यांची बहुत खातर केली. तेत्यांस ह्मणाले कीं, " तुह्मी माझे मोठे रणजीत सरदार आहां याचें मला फार भूषण वाटतें. तुह्मी कैलासवासी बाजीरावसाहेब यांचे अव्वलीपासून मोटचा परीश्रमानें नोकरी केली आहे. तुम्ही आमचे दौलतीचे वांटेदार आहां. " असा गौरव करून विठ्ठलराव यांस ग्वाल्हेर सरकरण्याचे कामीं बारा लक्ष रुपये खर्च झाला होता, त्याबद्दल त्यांनीं त्याच वेळेस बाळाजी गोविंद बुंदेले यांजवर वरात दिली; याशिवाय त्यांनीं विठ्ठलराव यांस चौघडा, जरीपटका, साहेबनौबत, व जरीलगी अशीं राजकीय भूषणें देऊन खेरीज एक उंची पोषाग व पुष्कळ जवाहीर बक्षिस दिले. नंतर विठ्ठलराव यांचे विनंतीवरून त्याच वेळेस माहादजी शितोळे मांजरीकर व अपाजी मुंढे (म्हणजे ज्यांनीं ग्वाल्हेरीस जाटाचे युद्धांत मोठें शौर्य केलें होतें ते, ) यांस बक्षिसें दिलीं. तीं अशीं:—माहादजी शितोळे यांस कृष्णातिरीं येडुराजवळ मांजरी नांवाचा गांव वंशपरंपरेनें इनाम करून दिला. आपाजी मुंढे बारगीर होते, त्यांस पागे करून एक गांव दिला. याप्रमाणें व्यावस्था करून नानासाहेब पेशव्यांची स्वारी होळकरांसह खासगी डेऱ्यास गेली. विठ्ठलराव हे जरी जखमी होते तरी ते दुसरे दिवशीं तसेच उटले आणि त्यांनीं आपले सरदार व मानकरी यांचा दरबार करून सावनूरचे संग्रामांत ज्यांनीं पराक्रम केले होते त्यांस बक्षिसें देऊन संतोषित केलें. सरजेखान व मस्तखान (म्हणजे ज्यांनीं किल्ल्यावरचें निशाण पाडून त्याच्या जागीं पागोटयाचें निशाण चढविलें होतें ) यांस फार मोठ्या किमतीचे पोषाग दिले आणि श्रीमंतांकडून आपल्यास जी जरीलगी मिळाली होती ती त्या उभयतांचे स्वाधीन करून त्यांस पागेचीं वर्षे दिलीं.

पायगुडे आडनांवाचे मानकरी होते त्यांचे स्वाधीन जरीपटका करून त्यांस पोषाग दिला. अशा प्रकारें विठ्ठलराव यांनीं आपल्या फौजेंतील शूर व विजयीं पुरुषांचा सन्मान करून त्यांचे आभार मानिले. सरजेखान, मस्तेखान व पायगुडे यांचे वंशज अद्याप विंचूर संस्थानांत पिढीजादे नौकर ह्मणून राहात आहेत.

याप्रमाणें सावनूरचा नबाब पराजीत झाला असतां, त्यानें पेशव्यांबरोबर तह केला. त्यांतील ठरावाअन्वयें पेशव्यांनीं त्यास सावनूरचा किल्ला बहाल केला आणि त्या नबाबानें त्यांस आपलें संस्थानापैकीं कांहीं मुलुक देऊन त्या स्वारीचें मुळकारण जो मुजफ्फरखान त्यास आपले नौकरीतून बडतर्फ केलें. नंतर पेशव्यांची स्वांरी जयश्रीनें पुण्यास परत आली. ही गोष्ट सन १७५६ इ० च्या अव्वलीस झाली.

## प्रकरण ४.

### रघुनाथराव दादासाहेब यांची उत्तर हिंदुस्थानांतील दुसरी स्वांरी.

विठ्ठल शिवदेव यांनीं सन १७५४ इ०सालीं रघुनाथराव पेशवे यांचे परवानगीवांचून ग्वाल्हेरचा किल्ला सरकेल्यामुळें त्यांजवर त्यांची व मुख्य पेशवे नानासाहेब यांची इतराजी झाली होती; परंतु सन १७५५ इ०सालीं त्यांनीं सावनूर येथें जो पराक्रम केला त्यामुळें उभयतांचीही त्यांजवर कमाल मेहेरबानगी झाली. पुढें सन १७५६ इ० चे आखेरीस उत्तरहिंदुस्थानांत मुलुकगिरी करावयाची तिजवर नानासाहेब यांनीं पूर्वीप्रमाणें रघुनाथराव यांचीच योजना केली असतां, त्यांनीं विठ्ठल शिवदेव व मल्हारराव होळकर वगैरे कित्येक सरदार व दिवाण सखाराम बापू बोकील यांस